cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१५५ | मंगळवार दि.२५ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# कर्जमाफीला प्रक्रियेला वेग!

## मुख्यमंत्र्यांच्याहस्ते ६ लाख ३६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर ५ हजार ८६ कोटी जमा

**मुंबई । प्रतिनिधी**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत राज्य सरकारने मंगळवारी (दि. २४) ५ हजार ८६ कोटी रुपयांचा निधी वितरित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राज्यातील ६ लाख ३६ हजार ३६ पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निधी वितरणाचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात राज्य सरकारने ५ हजार २९ कोटी रुपयांचा निधी ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केला होता. त्यानंतर मंगळवारी दुसऱ्या टप्प्यातील निधी वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे कर्जबाजारी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.**




राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेसाठी सरकारच्या तिजोरीवर सुमारे ३६ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार आहे. यामध्ये सुमारे ३२ लाख थकीत कर्जदार शेतकरी असून, २३ लाख शेतकरी प्रोत्साहनपर अनुदानासाठी पात्र असल्याचे सांगण्यात आले आहे. सरकारने थकीत कर्जदार शेतकऱ्यांची १६ लाख ९६ हजार पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध केली आहे. या यादीतील १२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. ई–केवायसी पूर्ण झालेल्या पात्र ▶▶ पान २ वर

### ४ लाख ३८ हजार शेतकरी अजूनही प्रतीक्षेत

दरम्यान, पहिल्या दोन याद्यांमध्ये पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांपैकी अद्याप ४ लाख ३८ हजार पात्र शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत. ई–केवायसीसह आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय, योजनेच्या पुढील लाभार्थी यादीकडेही राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. सरकारने ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याने पुढील टप्प्यात आणखी किती शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार, याबाबत उत्सुकता आहे.

# २९ ऑगस्टला आंदोलन होणारच-मनोज जरांगे

## सरकारच्या शिष्टमंडळासोबतची चर्चा निष्फळ?



**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण तापल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटीत आंदोलनाला सुरुवात करणार आहेत. दरम्यान, त्यापूर्वी सोमवारी सरकारच्या शिष्टमंडळातील मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री उदय सामंत यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतली. या भेटीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आता मागे हटणार नाही. २९ ऑगस्टला ▶▶ पान २ वर

### झारीतील शुक्राचार्यांचा बंदोबस्त करणार – राधाकृष्ण विखे पाटील

मराठा आरक्षणासंबंधी राज्य शासनाने आदेश दिले आहेत, मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही, अशी स्पष्ट कबुली राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. काही अधिकारीच सरकारला बदनाम करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचेही विखे पाटील म्हणाले. यापुढे ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना प्रमाणपत्र देण्यामध्ये कुणी जाणिवपूर्वक टाळाटाळ करत असेल तर त्याची चौकशी केली जाणार, असे राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, ''मराठा आरक्षणासंबंधी समाजाच्या मागण्या मान्य होत आहेत, पण त्याची अंमलबजावणी होत नाही हे दुर्दैव आहे. या प्रकरणात प्रशासनातील काही झारीतील शुक्राचार्य कार्यरत असून, त्यांचा बंदोबस्त झाला पाहिजे. दाखले देण्यात जाणिवपूर्वक टाळाटाळ होत असेल तर त्याची चौकशी केली जाईल. पुन्हा असे प्रकार होणार नाहीत याची काळजी घेऊ.

# अ.नगरमध्ये खासगी आरोग्य विद्यापीठ

## मंत्रिमंडळ बैठकीत ४ महत्त्वाचे निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी मंत्रालयात संपन्न झाली. राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत ४ महत्त्वाचे निर्णय घेतले असून क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्यांना भेट देण्यात आली आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरी खेळाडूंच्या बक्षिस धोरणात सुधारणा करण्यात आली आहे. यासह, नागपूर, नाशिक आणि जत शहरांमधील विविध संदर्भाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात आले आहेत.**

राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत ४ महत्त्वाचे निर्णय घेतले असून, क्रीडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महसूल व वन विभाग आणि विधि व न्याय विभागाच्या अंतर्गत हे चार निर्णय घेण्यात आले आहेत. त्यानुसार, अहिल्यानगर येथे डॉ. बाळासाहेब विखे पाटील खासगी आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापनेला मंजुरी देण्यात आली आहे. सांगली जिल्ह्यातील जत नगरपरिषदेला प्रशासकीय इमारत उभारणीसाठी जागा देण्यात आली आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय, ▶▶ पान २ वर

# रुपाली चाकणकर बदनामी प्रकरणात मोठी कारवाई

## दिपाली सय्यद, अंधारे यांच्यासह १९ जणांविरोधात गुन्हा दाखल!

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा आणि राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली चाकणकर यांची बदनामी केल्याप्रकरणी १९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे, अभिनेत्री दिपाली सय्यद, संगीता तिवारी, आशा मिरगे, हनुमंत गलगटे यांच्यासह इतरांचा समावेश आहे.**

भोंदू अशोक खरातच्या संपर्कात असलेल्या राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची बदनामी केल्याप्रकरणी १९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रुपाली चाकणकर यांच्याकडून काही दिवसांपूर्वी पुण्यातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांकडून सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांमधे रुपाली ठोंबरे, सुषमा अंधारे, दिपाली सय्यद, संगीता तिवारी, आशा मिरगे, हनुमंत गलगटे, वर्षा कांबळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सोशल मीडियाचे पदाधिकारी योगेश सावंत, मोहसीन शेख ▶▶ पान २ वर

# शब्द पाळा,न्याय द्या!

## ५ सप्टेंबरला दिल्लीत 'सीजेपी'चा महामोर्चा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

सरकारने २५ जुलै रोजी दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण केली नसल्याचा गंभीर आरोप करत 'कॉकरोज जनता पार्टी'कडून आगामी ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत भव्य शांततापूर्ण मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. इंडिया गेटपासून नवी दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार असून, सरकारने दिलेला शब्द पाळावा, अशी मागणी या माध्यमातून करण्यात येणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व नीट परीक्षेतील कथित गैरप्रकारांचे पीडित विद्यार्थी व त्यांच्या कुटुंबीयांसह पोलीस अत्याचाराचे बळी ठरलेले नागरिक करणार असल्याचे संघटनेने जाहीर केले आहे.



विद्यार्थी, विविध युवा संघटना आणि देशभरातील तरुणांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

१८ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने एफआयआरची यादी मागितली असतानाही सरकारकडून याबाबत कोणतेही स्पष्ट आश्वासन देण्यात आलेले नाही, असा दावा सीजेपीकडून करण्यात आला आहे. त्यामुळे न्यायाच्या मागणीसाठी ५ सप्टेंबरचा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे संघटनेने म्हटले आहे. कॉकरोज जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यापूर्वी 'स्कूल ठीक करो' आंदोलन सुरू केले होते. महाराष्ट्रातील सरकारी ▶▶ पान २ वर

# मराठा-ओबीसी वादात भुजबळांची माघार की राजकीय खेळी?

**पुणे –बीड । प्रतिनिधी**

**राज्यातील राजकीय वातावरण तापवणारा मराठा विरुद्ध ओबीसी आरक्षणाचा तिढा आता एका नव्या वळणावर येऊन ठेपला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी घेतलेल्या सावध भूमिकेमुळे ओबीसी आणि मराठा आंदोलकांमध्ये थेट सुरू असलेला सामना आता मराठा आंदोलक विरुद्ध राज्य सरकार असा थेट रंगताना दिसत आहे.**



### सरकारची तारेवरची कसरत

आतापर्यंत मराठा – ओबीसी यांच्यामध्ये संघर्ष होता त्यामुळे शासनाला कोणताच निर्णय घेता येत नव्हता. मराठा असो की ओबीसी दोघांच्याही कोपराला गूळ लावलेला होता, परंतु आता ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी केलेल्या वक्तव्यामुळे यापुढे सरकारला तारेवरची कसरत करावी लागणार आहे. मराठा समाजाला टिकणारे आणि ओबीसींना धक्का न लावता असे आरक्षण देण्यासाठी कसरत करावी लागणार हे मात्र निश्चित आहे.

गेल्या काही महिन्यांपासून मराठा आरक्षणाच्या विरोधात ओबीसींची ढाल बनून उभे राहिलेले छगन भुजबळ यांनी अचानक आपल्या भूमिकेत बदल केल्याचे संकेत दिले आहेत. ''मनोज जरांगे पाटील यांची लढाई आमच्या विरोधात नाही, तर शासनाविरोधात आहे;




त्यामुळे आम्ही उगाच मध्ये कशाला पडायचे? सरकार यावर बोलेल आणि योग्य तो निर्णय घेईल,'' अशा शब्दांत भुजबळांनी या वादातून अप्रत्यक्षपणे स्वतःला बाजूला केले आहे. या वक्तव्यामुळे ओबीसी विरुद्ध मराठा वादातील आक्रमकता काहीशी शांत झाली असली, तरी वादाचे केंद्र आता थेट मंत्रालयाच्या दिशेने सरकले आहे. आतापर्यंत जेव्हा जेव्हा मनोज जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षण आंदोलन तीव्र व्हायचे, तेव्हा ओबीसी नेत्यांकडून त्याला तितकेच जोरदार प्रत्युत्तर दिले जायचे. यामुळे दोन्ही समाजांमध्ये संवाद आणि तोडगा काढण्यासाठी सरकारला काही प्रमाणात वेळ आणि आधार मिळत होता. मात्र, भुजबळांच्या या भूमिकेमुळे जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या आणि रोष आता थेट सत्ताधाऱ्यांवर येऊन आदळत आहेत. एकीकडे मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देणे आणि दुसरीकडे ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावणे, अशा दुहेरी पेचात अडकलेल्या ▶▶ पान २ वर



# साखर कारखान्यांच्या गोडाऊनवर छापे टाका

**सोलापूर । प्रतिनिधी**

एका बाजूला साखरेचा दर ७५ रुपये किलो झाल्याने नागरिक त्रस्त झाले असून त्याचा कोणताही फायदा शेतकऱ्याला झालेला नाही. साखरेच्या वाढत्या दराच्या फायद्यासाठी सर्व कारखानदार आणि व्यापाऱ्यांची मिलीभगत असून मोठ्या प्रमाणात साखरेची साठेबाजी झाल्याचा आरोप शेतकरी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### अमरावती रूग्णालयात आग;तीन बालकांचा मृत्यू

अमरावतीः येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवीन इमारतीतील शिशू अतिदक्षता विभागात सोमवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. या दुर्दैवी घटनेत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. आग लागल्यानंतर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी धावपळ करत इतर बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. तसेच आगीवर नियंत्रण मिळविण्यात यशही आले. अति दक्षता विभागातील व्हेंटीलेटरचा अचानक स्फोट झाला. त्यानंतर ती आग झपाट्याने पसरली. मात्र रूग्णालयातील कर्मचाऱ्यांनी या कक्षातील इतर बालकांना सुरक्षितपणे हलविण्यास सुरुवात केली. रूग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर आगी लागली होती. या ठिकाणी एकूण तीन नवजात शिशु अतिदक्षता विभाग आहेत. या तीन कक्षांमध्ये प्रत्येकी १३ मिळून ३९ नवजात बालकांवर उपचार करण्याची क्षमता आहे. त्यापैकी एका कक्षाला आग लागली.

### आरक्षण विरोधकावर गुन्हा दाखल करा–आठवले

दिल्लीःकेंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आरक्षणाला विरोध करणाऱ्या किंवा रद्द करण्याची मागणी करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे, ज्याला त्यांनी घटनात्मक अधिकार म्हटले आहे. आठवले म्हणाले, कोट्याविरोधातील निदर्शने, ज्यात दिल्लीच्या जंतर–मंतरवरील आंदोलनांनी हा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आणला आहे. सोशल मीडियावरही कोटा सिस्टीम हटवण्याची किंवा बदल करण्याची मागणी करणाऱ्या मोहिमा सुरू आहेत. आरक्षणाला विरोध हा संविधानाला विरोध आहे. जे आरक्षणविरोधी भूमिका घेतात ते घटनाविरोधी आहेत आणि त्यांच्यावर देशद्रोहाची कठोर कारवाई झाली पाहिजे. काही लोक आरक्षण रद्द करण्याची मागणी करत होते. आरक्षण हा घटनात्मक अधिकार असल्याने तो रद्द करता येणार नाही, असे ते म्हणाले. जंतरमंतर येथे मोठ्या संख्येने आंदोलक बॅनर, पोस्टर आणि भगवे झेंडे घेऊन जमले होते आणि त्यांनी जातीवर आधारित आरक्षणाविरोधात घोषणाबाजी केली. सरकारी समर्थन आणि आरक्षणासाठी पात्रता ठरवताना आर्थिक निकषांना जातीपेक्षा प्राधान्य द्यावे, अशी आंदोलकांची मागणी होती.

### साखर दरवाढीत २० हजार कोटींचा महाघोटाळा–शेट्टी

बारामतीः देशात साखरेचा पुरेसा साठा असताना अचानक दरवाढ होण्यामागे नेमके कारण काय? असा सवाल माजी खासदार राजू शेट्टी यांनी उपस्थित केला. या दरवाढीत सुमारे २० हजार कोटींचा घोटाळा होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून केंद्राच्या कारभाराबाबत सवाल उपस्थित केल्याचेही त्यांनी सांगितले. बारामतीत ते पत्रकारांशी बोलत होते. शेट्टी यांनी पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात साखरेच्या दरवाढीचा हिशोब मांडला आहे. शेट्टी यांच्या म्हणण्यानुसार, ऑगस्ट २०२५ मध्ये साखरेचा दर ३,७०० रुपये प्रति क्विंटल होता. यंदाच्या ऑगस्टमध्ये तो ६,७०० रुपये प्रति क्विंटलवर पोहोचला. अवघ्या वर्षभरात त्यात ३ हजार रुपयांची वाढ झाली. अलीकडील काळात किलोमागे थेट २० रुपयांची अचानक वाढ झाली. त्यामुळे शेट्टी यांनी साखर साठ्याच्या उपलब्धतेबाबत शंका उपस्थित केली आहे. २०२४–२५ मध्ये देशात २९० लाख टन उत्पादन झाले. मागील हंगामातील सुमारे ५० लाख टन प्रारंभिक साठा धरला, तर देशाकडे दोन वर्षांसाठी मोठ्या प्रमाणात साखर उपलब्ध असल्याचे शेट्टी म्हणाले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ ऑगस्ट २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९७.०० क्विंटल | २,३०० | २,७८० | २,५४२ |
| ज्वारी/हायब्रिड: ८४.०० क्विंटल | २,३०१ | ४,४०० | २,७४० |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: २४.५० क्विंटल | २,३७१ | २,६९७ | २,५९४ |
| मुग: ४.५० क्विंटल | ८,७०० | ८,८३१ | ८,७६५ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: १५.०० क्विंटल | ५,८३० | ५,८३० | ५,८३० |

cmyk

## अग्रलेख

# शिक्षणव्यवस्थेचा आरसा सरकारच्या चेहऱ्यावर

देशाचे भवितव्य संसदेतल्या भाषणांत किंवा मंत्रालयांच्या फाईलमध्ये घडत नाही; ते घडते शाळेच्या वर्गखोलीत. आज बाकावर बसलेले मूल उद्याचा नागरिक, वैज्ञानिक, शिक्षक, उद्योजक किंवा लोकप्रतिनिधी होणार आहे. त्यामुळे देशातील शालेय शिक्षणव्यवस्था किती मजबूत आहे, यावरच भारताच्या भवितव्याची दिशा ठरणार आहे. अशा वेळी नीती आयोगाचा २०२६ मधील '' स्कूल एज्युकेशन सिस्टीम इन इंडिया : टेम्परल अनालिसीस अॅन्ड पॉलिसी रोडमॅप फॉर क्वॉलिटी इन्हार्समेंट '' हा अहवाल सरकारच्या शिक्षणविषयक दाव्यांसमोर एक अस्वस्थ करणारा आरसा उभा करतो.

भारताकडे जगातील सर्वात मोठ्या शालेय शिक्षणव्यवस्थांपैकी एक व्यवस्था आहे. युडिसे २०२४-२५ नुसार देशात १४.७१ लाखांहून अधिक शाळा, २४.६९ कोटी विद्यार्थी आणि सुमारे १.०१ कोटी शिक्षक आहेत. गेल्या दशकात वीज, इंटरनेट, संगणक, डिजिटल सुविधा यामध्ये लक्षणीय वाढ झाली. २०१४-१५ मध्ये ५५.९६ टक्के शाळांमध्ये कार्यरत वीज होती; २०२४-२५ मध्ये हा आकडा ९१.९ टक्क्यांवर पोहोचला. इंटरनेट सुविधा ८.०५ टक्क्यांवरून ६३.५ टक्क्यांपर्यंत वाढली. ही प्रगती निश्चितच स्वागतार्ह आहे. पण इथेच शिक्षणव्यवस्थेचा खरा प्रश्न उभा राहतो. शाळेत वीज आली, इंटरनेट आले, संगणक आला; पण मुले खरेच शिकली का? हा प्रश्न विचारण्याचं कारण म्हणजे मूलभूत शिक्षणाच्या गुणवत्तेचं चित्र. अहवालातील विश्लेषणानुसार दुसरीच्या पातळीवरील मजकूर वाचू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचं प्रमाण २०१४ मधील ७४.७ टक्क्यांवरून २०२४ मध्ये ७१.१ टक्क्यांवर आलं. सरकारी शाळांमध्ये ही घसरण ७१.५ टक्क्यांवरून ६७.५ टक्क्यांपर्यंत आहे. म्हणजे पायाभूत सुविधा वाढत असताना मूलभूत वाचन क्षमतेचा आलेख अपेक्षेप्रमाणे वर गेलेला नाही. गणिताची स्थितीही फार वेगळी नाही. तिसरीच्या विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत वजाबाकी सोडवू शकणाऱ्यांचं प्रमाण अजूनही अपेक्षित पातळीपासून दूर आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे, शाळेत प्रवेश वाढवणे ही शिक्षणव्यवस्थेची अंतिम कामगिरी नाही; शाळेत गेल्यानंतर मुलं काय शिकतात, ही खरी कसोटी आहे. याहून गंभीर बाब म्हणजे सरकारी शाळांवरील घटता विश्वास.

२००५ मध्ये देशातील एकूण विद्यार्थ्यांपैकी सुमारे ७१ टक्के विद्यार्थी सरकारी शाळांमध्ये होते. २०२४-२५ मध्ये हा वाटा ४९.२४ टक्क्यांवर आला. दशकभराच्या युडीसे तुलनेतही सरकारी शाळांमधील विद्यार्थीवाटा २०१४-१५ मधील ५४.३ टक्क्यांवरून सुमारे ४९.२५ टक्क्यांवर आला, तर खासगी शाळांचा वाटा ३१.७ टक्क्यांवरून ३८.८ टक्क्यांपर्यंत वाढला. हा केवळ आकड्यांचा बदल नाही. हा पालकांच्या विश्वासाचा प्रश्न आहे. सरकारी शाळांची संख्या २०१४-१५ मधील सुमारे ११.०७ लाखांवरून २०२४-२५ मध्ये १०.१३ लाखांपर्यंत घटली. परंतु या प्रक्रियेत ग्रामीण, दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाच्या संधींवर परिणाम होत नाही ना, याचीही सरकारने तपासणी करणे आवश्यक आहे. खासगी शाळांकडे पालकांचा वाढता कल हा केवळ इंग्रजी माध्यमाचा मोह नाही. शिस्त, रोजगाराच्या संधी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा यामागे आहे. मात्र खासगी शिक्षणालाही गुणवत्ता हमीचे प्रमाणपत्र देता येणार नाही. कमी शुल्काच्या खासगी शाळांमध्येही मूलभूत वाचन आणि गणित कौशल्यांमध्ये मोठी कमतरता असल्याचं अहवालातील आकडेवारी दाखवते. त्यामुळे प्रश्न सरकारी विरुद्ध खासगी असा नसून, दर्जेदार शिक्षण विरुद्ध अपुरी गुणवत्ता असा आहे. शिक्षकांच्या रिक्त जागा हा या संकटाचा आणखी एक केंद्रबिंदू आहे. देशभरात शिक्षकांची संख्या मोठी असली तरी अनेक राज्यांमध्ये हजारो पदे रिक्त आहेत. त्याहून गंभीर म्हणजे एकाच शिक्षकावर चालणाऱ्या शाळांची संख्या मोठी आहे. एका शिक्षकाने अनेक वर्ग, अनेक विषय, प्रशासकीय कामं आणि सरकारी योजनांची अंमलबजावणी सांभाळायची, ही अपेक्षा शिक्षणाच्या गुणवत्तेला कितपत न्याय देणार? शिक्षकांना दोष देणं सोपं आहे; पण शिक्षकांना आवश्यक मनुष्यबळ, प्रशिक्षण आणि संसाधनं न देता गुणवत्तेची अपेक्षा करणं ही व्यवस्थेची जबाबदारी झटकण्याची पद्धत आहे. तरीही या चित्रात आशेचे किरण आहेत. विद्यार्थ्यांच्या संक्रमण दरात सुधारणा झाली आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील सकल प्रवेश दरही वाढला आहे. पायाभूत सुविधांमध्ये मोठी प्रगती झाली आहे. म्हणजे सरकारच्या प्रयत्नांना नाकारता येणार नाही. पण आता शिक्षण धोरणांचा पुढचा टप्पा सुरू करण्याची वेळ आली आहे. आता प्रश्न असायला हवा, शाळेत शिक्षण आहे का? राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, समग्र शिक्षा, निपुण भारत यांसारख्या योजनांचा खरा परिणाम वर्गखोलीत दिसला पाहिजे. डिजिटल बोर्ड, इंटरनेट आणि स्मार्ट क्लासरूम हे शिक्षणाचे साधन आहेत; ते स्वतः शिक्षणाची गुणवत्तां नाहीत. सरकारने मूलभूत साक्षरता, अंकगणित, शिक्षकांची उपलब्धता, शाळा सोडण्याचे प्रमाण आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. नीती आयोगाने स्कूल ऑफ कॉम्पलेक्सेस , स्कूल क्लस्टर्स, शाळा व्यवस्थापन समित्यांचे सक्षमीकरण, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, मूलभूत साक्षरता-अंकगणित, व्यावसायिक कौशल्ये आणि मानसिक आरोग्य यावर भर दिला आहे. आता गरज आहे ती या शिफारशी कागदावर न ठेवता वेळबद्ध कृती आराखड्यात रूपांतरित करण्याची. कारण शिक्षण हा केवळ अर्थसंकल्पातील एक विभाग नाही. तो सामाजिक न्यायाचा पाया आहे. श्रीमंत कुटुंबातील मुलाला दर्जेदार शिक्षणाची अनेक दारे उपलब्ध असतात; पण गरीब कुटुंबातील मुलासाठी सरकारी शाळा हीच अनेकदा भविष्यात जाण्याची सर्वात मोठी संधी असते. त्यामुळे सरकारी शाळा कमकुवत होणे म्हणजे केवळ एका संस्थेची अधोगती नव्हे; तो सामाजिक विषमता वाढण्याचा धोका आहे.

आज सरकारने स्वतःला काही कठोर प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांचा वाटा का घटतो आहे? शिक्षकांच्या रिक्त जागा कधी भरल्या जाणार? एकाच शिक्षकावर चालणाऱ्या शाळांचा प्रश्न कधी संपणार? प्रत्येक मुलाला त्याच्या इयत्तेनुसार वाचता, लिहिता आणि गणित करता येण्यासाठी निश्चित कालमर्यादेचा कार्यक्रम कधी तयार होणार? शिक्षणव्यवस्थेचा आरसा सरकारसमोर आहे. त्यात फक्त वाढलेल्या शाळा, वाढलेली वीज आणि वाढलेलं इंटरनेट दिसत नाही; त्यात अजूनही शिकण्यासाठी धडपडणाऱ्या मुलांचे चेहरे दिसतात. म्हणून शिक्षणाच्या यशाची मोजणी आता इमारतींच्या संख्येने, स्मार्ट क्लासरूमच्या उद्घाटनांनी किंवा डिजिटल सुविधांच्या आकड्यांनी होऊ नये. खरी मोजणी एका साध्या प्रश्नाने झाली पाहिजे. वर्गखोलीत बसलेलं मूल खरंच शिकतंय का? कारण देशाची खरी प्रगती मंत्रालयाच्या अहवालात नव्हे, तर सरकारी शाळेतील एका मुलाला पुस्तक समजून वाचता येते, गणिताची समस्या सोडवता येते आणि आत्मविश्वासाने भविष्याकडे पाहता येते, त्या क्षणी दिसली पाहिजे. नीती आयोगाचा अहवाल म्हणूनच अभिनंदनाचा दस्तऐवज नसून, आत्मपरीक्षणाचा आरसा आहे. आता हा आरसा पाहायचा की फोडायचा, याचा निर्णय सरकारला घ्यायचा आहे.

# दुष्काळसदृश परिस्थिती सरकारने आता शेतकऱ्याचा अंत पाहू नाही दुष्काळ जाहीर करा-खा.डॉ.कल्याण काळे

## पिकांची पाहणी व पंचनामे करून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात चालू खरीप हंगामात अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नसून पावसामध्ये मोठ्या प्रमाणात खंड पडल्याने शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. आता सरकारने शेतकऱ्याचा अंत नाही पाहता दुष्काळ जाहीर करून मदत करण्याचं घोषणा करावे अशी मागणी खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केली आहे.पिके काही ठिकाणी हिरवी दिसत असली तरी जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिकांची वाढ मोठ्या प्रमाणात खुंटली असून उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

खा. डॉ. काळे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका यांसह विविध खरीप पिकांवर पावसातील दीर्घ खंडाचा विपरीत परिणाम झाला आहे. पिकांची वाढ खुंटल्याने अपेक्षित उत्पादन धोक्यात आले आहे. केवळ पिके हिरवी दिसत आहेत म्हणून परिस्थिती समाधानकारक असल्याचा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. पावसाअभावी जिल्ह्यातील ऊस पिकाची वाढ खुंटली असून अपेक्षित उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच फळबागांमध्येही पाण्याअभावी झाडांची वाढ, फळधारणा आणि उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे फळबागायतदार शेतकऱ्यांसमोर सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्ह्यात पावसातील खंड, घटलेली जमिनीची आर्द्रता, पिकांची खुंटलेली वाढ, उपलब्ध पाणीसाठे, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याची संभाव्य टंचाई या सर्व बाबींचा विचार करता परिस्थिती गंभीर असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी निवेदनात निदर्शनास आणून दिले आहे. जिल्ह्यातील १६ गावे व १३ वाड्यांना एकूण २८ टँकरद्वारे



पाणीपुरवठा केला जात असून ३० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाईची परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असून प्रशासनाने आतापासूनच आवश्यक उपाययोजना करण्याची गरज असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी म्हटले आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पर्जन्यमान, पावसातील खंड, जमिनीतील ओलावा, पिकांची वाढ आणि सद्यस्थिती यांचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करावे. खरीप पिकांसोबतच ऊस व फळबागांचे स्वतंत्र पंचनामे करून पीकस्थितीचे मूल्यांकन करावे. तसेच पिकांचा केवळ बाह्य हिरवेपणा न पाहता पावसातील खंड, जमिनीतील ओलावा, पिकांची वाढ आणि अपेक्षित उत्पादनातील घट या बाबींचा विचार करून दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तालुकानिहाय पीकस्थितीचा अहवाल तातडीने शासनाकडे सादर करून जालना जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव पाठवावा, अशी आग्रही मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. दुष्काळ जाहीर झाल्यास शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार पीकनुकसान भरपाई, पीकविमा लाभ, पाणी व चारा उपलब्धता, कृषी निविष्ठांबाबत मदत तसेच इतर अनुज्ञेय सवलती व उपाययोजनांचा लाभ तातडीने मिळवून द्यावा. तसेच भविष्यात पावसाची परिस्थिती आणखी प्रतिकूल झाल्यास पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि शेतीसाठी उपलब्ध पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन पूर्वतयारीचा आराखडा तयार करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. ''परिस्थिती हाताबाहेर जाण्याची वाट न पाहता प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवालाच्या आधारे तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संकटाच्या काळात प्रशासनाने दिलासा देण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी,'' असे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी निवेदनात म्हटले आहे. यावेळी शिवसेना (उबाठा) जिल्हाध्यक्ष मनिष श्रीवास्तव, कॉँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, बदर भाई चाऊस, मुरलीधर शेजूळ, प्रभाकर मामा पवार, कृष्णा पा. पडूळ (तालुकाध्यक्ष, कॉँग्रेस कमिटी, जालना), सुभाष कोळकर, अशोकराव उबाळे, अब्दुल रऊफ, शांतीलाल बनसोडे, दिनेश सुराणा, सय्यद करीम, सोपान तिरुखे, ज्ञानेश्वर डुकरे, ज्ञानदेव इंगोले, गणेशराव खरात, प्रकाश नारायण, वाढेकर, गजानन उगले, रघुवीर गुढे, योगेश कदम, शेषराव जाधव, शेख वासिम, शेख जमीर, रज्जाक, योगीताताई धांडगे, संजय बागल, वसीम खान, एस. आर. काळे, बाबा चांगुलपाय, राहुल जयस्वाल, शेख अमीन, दिनेश कावळे, राजू शेळके, कलीम खान, दिग्विजय धांडगे, आरेफ खान यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिमराव सोळंके यांचे निधन



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील गंगामसला येथील माजलगाव सह.साखर कारखान्याचे माजी संचालक,शिक्षक तथा नॅशनल कुस्ती पटु भिमराव घनशामराव सोळंके यांचे वृद्धापकाळाने दि २३ ऑगस्ट रविवार रोजी रात्री १०:३० वाजता दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९२ वर्ष होते. २४ ऑगस्ट सोमवार रोजी दुपारी १२:०० वाजता गंगामसला येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले व दोन मुली असा परिवार आहे.गंगामसला येथील प्रगतशील शेतकरी विजयसिंह भीमराव सोळंके यांचे ते वडील होत.

# पतीसोबतच्या वादातून महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न; पोलिसांच्या सतर्कतेने वाचला जीव

**जालना । प्रतिनिधी**

**पतीसोबत झालेल्या वादातून भावनिकदृष्ट्या खचलेल्या एका महिलेने मोती तलाव, जालना येथे दिनांक २४ ऑगस्ट २०२६ आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रसंगावधान राखत चंदनझिरा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत कौशल्यपूर्ण संवाद, संयम आणि समजूतदारपणाच्या माध्यमातून सदर महिलेला आत्महत्येपासून परावृत्त करून तिचे प्राण वाचविले.**

सदर महिला मोती तलाव परिसरात आत्महत्या करण्याच्या उद्देशाने गेल्याची माहिती मिळताच चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी पोलीस पथकास मोतीबाग येथे पाठवीले होते. पोलीस पथकाने विलंब न करता घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा अंदाज घेतला. पोलिसांनी कोणतीही घाई किंवा दबाव न आणता तिच्याशी शांतपणे संवाद साधला. तिच्या मनातील भावना समजून घेत संवेदनशीलता व कौशल्यपूर्ण संवादातून तिच्या मनातील नकारात्मक विचार दूर करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांच्या समुपदेशनाला सकारात्मक प्रतिसाद देत महिलेने आत्महत्येचा विचार सोडून



दिला. त्यानंतर पोलिसांनी सदर महिलेला सुरक्षितपणे ताब्यात घेऊन तिच्या नातेवाईकांशी संपर्क साधला व तिला सुखरूपपणे नातेवाईकांच्या स्वाधीन केले. काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर येथे आयफोनच्या मागणीवरून एका तरुणाने डोंगरावर जाऊन आत्महत्या केल्याची आणि त्यानंतर त्याच्या आई-वडिलांचाही डोंगरावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, चंदनझिरा पोलिसांनी प्रसंगावधान, संवेदनशीलता आणि संवादकौशल्याच्या जोरावर एका महिलेचे अमूल्य प्राण वाचविले आहेत. या कारवाईत चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांनी दाखविलेल्या तत्परता, संयम, संवेदनशीलता आणि मानवी दृष्टिकोनाचे सर्वत्र कौतुक होत आहे. ''क्षणिक राग, दुःख किंवा नैराश्यात घेतलेला निर्णय संपूर्ण आयुष्य बदलू शकतो; मात्र योग्य वेळी मिळालेला आधार आणि संवाद एखाद्याचे आयुष्य वाचवू शकतो.'' हा संदेश या घटनेतून अधोरेखित झाला आहे. ही कामगिरी मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोउपनि दिगंबर पवार, मारीयो स्कॉट, सय्यद हुसेन, सफौ मनसुब वेताळ, पोहेकॉ शिवाजी जमधडे, महीला पोहेकॉ रेश्मा गुरुम, जया जैस्वाल यांचे पथकाने केली आहे.

# गणेश देशमाने यांचे दुःखद निधन

**मंठा । प्रतिनिधी**



शहरातील रहिवासी आणि रायपूर (ता. सेलू) येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गणेश कामाजी देशमाने (वय ५४) यांचे रविवारी (ता. २३) उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार विधी मंठा येथील बौद्ध स्मशानभूमीमध्ये करण्यात आला. यावेळी राजकीय सामाजिक, वैद्याकीय, पत्रकारिता, शिक्षक,साहित्य, सांस्कृतिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार, नातेवाईक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात आई - वडील, मोठा भाऊ, बहीण, पत्नी, दोन मुली, जावई, मुलगा असा परिवार आहे. शिक्षक नामदेव देशमाने यांचे ते मोठे बंधू होत.

# पान १ वरून...

### कर्जमाफीला

शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने कर्जमाफीचा लाभ दिला जात आहे. आतापर्यंत १२ लाख ५८ हजार २४३ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात आला असून, दोन्ही टप्प्यांत मिळून १० हजार ११५ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. मंगळवारी झालेल्या निधी वितरणामुळे लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या आणखी वाढली आहे.

-------------

### अ.नगरमध्ये खासगी

राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्यातील खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना दिल्या जाणाऱ्या रोख बक्षिस धोरणात सुधारणा. नागपूर येथे लता मंगशेकर विद्यापीठ स्थापन होणार. तसेच अहिल्यानगर येथे डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठ होणार आहे. या खासगी आरोग्य विज्ञान विद्यापीठात वैद्यकशास्त्र, दंतवैद्यक, फिजिओथेरपी आणि नर्सिंग विद्याशाखांमधील पदवी, पदव्युत्तर आणि सुपर स्पेशॅलिटी अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत (ता. निफाड) येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय होणार. त्यासाठीची पदे व अनुषांगिक खर्चाच्या तरतुदीस मान्यता.

--------------

### २९ ऑगस्टला आंदोलन

आंदोलन होणारच असल्याची माहिती मनोज जरांगेंनी दिली. ज्या नोंदी शोधल्या आहेत, त्या सर्वांची प्रमाणपत्र २८ ऑगस्टच्या आतमध्ये सरकारने द्यावी, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे. आता आंदोलन थांबणार नाही, २९ ऑगस्टला आंदोलन होणार असल्याचे पाटील म्हणाले. मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे सवलतीबाबतचा निर्णय २८ ऑगस्टच्या लागू करा, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली. मराठा आंदोलकावरील केसेस मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण करा, बलिदान दिलेल्या बांधवांचा निधीचा विषय राहिला आहे, तो पूर्ण करा असेही जरांगे यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे सातारा पुणे, बॉम्बे औंध गॅझेटर संबंधीचा जी आरची मागणी आहे, ती पूर्ण करा असेही जरांगे म्हणाले. ज्यांचे प्रमाणपत्र, व्हॉलिडिटी राहिली असेल त्यांनी २८ ऑगस्टला अंतरवाली मध्ये यावे असे आवाहन देखील जरांगेंनी केले आहे.

---------------

### शब्द पाळा,न्याय

शाळांच्या प्रश्नांवर अभिजीत दिपके, तर राजस्थानातील सरकारी शाळांच्या दुरावस्थेविरोधात आशुतोष रांका आणि त्यांचे सहकारी काम करत होते. राजस्थानातील जयपूर येथे एका सरकारी शाळेची पाहणी करण्यासाठी गेलेल्या आशुतोष रांका आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर हल्ला झाल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर हल्लेखोरांना ताब्यात घेऊन शाळेची परिस्थिती सुधारली नाही, तर आंदोलन करण्याचा इशारा अभिजीत दिपके यांनी राजस्थान सरकारला दिला होता. दरम्यान, दिल्लीतील एका आंदोलनादरम्यान पॅलेट गनच्या छऱ्यांनी जखमी झालेल्या तरुणाची एफआयआर दिल्ली पोलिसांकडून दाखल करून घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन केले होते. अनेक तासांच्या आंदोलनानंतर संबंधित तरुणाची एफआयआर दाखल करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. या पार्श्वभूमीवर आता ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत होणाऱ्या मोर्चाकडे सर्वांचे लक्ष लागले असून, सरकार या मागण्यांवर कोणती भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**लैंगिक छळाच्या प्रकरणांची सर्वप्रथम चौकशी होणार – सरन्यायाधीश**

विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस हिंसाचाराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय चौकशी समितीला महिला आंदोलनकर्त्यांवरील लैंगिक अत्याचाराच्या तक्रारी प्राधान्याने हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात दिलेल्या आदेशानुसार या समितीने लैंगिक अत्याचाराच्या तक्रारींवर लवकरात लवकर अंतरिम अहवाल सादर करायचा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. २० जुलै रोजी जंतरमंतर येथील विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घ्यावी, अशी विनंती वरिष्ठ वकील शोभा गुप्ता यांनी केली. महिलांवर पोलिस अधिकाऱ्यांकडून विनयभंग झाल्याच्या अनेक तक्रारी समोर आल्याचे सांगत गुप्ता म्हणाल्या, ''आपल्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचा दावा अनेक मुली करत असून, सोशल मीडियावरही याच्या बातम्या मोठ्या प्रमाणावर आल्या आहेत.

-----------

### रुपाली चाकणकर बदनामी

आणि महादेव बालगुडे यांचा समावेश आहे. आता या सर्वांवर काय कारवाई होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले होते की, अशोक एकनाथ खरात यांच्याशी त्यांची ९ वर्षांपूर्वी एका सामाजिक कार्यक्रमात ओळख झाली होती. मंदिराच्या धार्मिक कार्यक्रमानिमित्त मी तिथे जात होती. १८ मार्च २०२६ रोजी खरात यांना बलात्काराच्या गुन्ह्यात अटक झाल्याचे प्रसार माध्यमांमधून समजले. त्यानंतर खरात यांच्यासोबत सामाजिक कार्यक्रमातील फोटो वापरून माझ्यावर आरोप करण्यात आले. २० मार्च २०२६ रोजी सोशल मीडिया तपासताना १९ फेसबुक / इंस्टा / युट्यूब अकाउंटवरून बदनामीकारक, अश्लील आणि धमकीवजा पोस्ट टाकल्याचे आढळले. या सर्वांची नावे आणि पोस्टचे स्क्रीनशॉट चाकणकर यांच्याकडून पोलिसांना देण्यात आले आहेत. आता पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, आगामी काळात कठोर कारवाई केली जाण्याची शक्यता आहे.

-----------------

### साखर कारखान्यांच्या

संघटनांकडून होत आहे. तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यामार्फत राज्यातील कारखान्यांच्या गोडाऊनवर छापे टाकल्यास साखरेचे साठे बाहेर येतील, अशी आक्रमक भूमिका पंढरपूर येथे झालेल्या सर्व शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधी बैठकीत घेण्यात आली. साखर प्रति किलो ७५ रुपये आणि उसाला प्रति किलो तीन रुपये दर हे कसे चालणार असा संतप्त सवाल शेतकरी संघटनेच्या नितीन बागल यांनी विचारला. साखरेच्या साठेबाजांवर कारवाई करण्याऐवजी केंद्र सरकार पुढच्या महिन्यात १० लाख टन साखर आयात करणार असून हा डाव हाणून पाडायचा आहे, अशी भूमिका दीपक भोसले यांनी घेतली. राज्यातील आणि देशातील व्यापाऱ्यांची गोडाऊन तपासल्यास पुढील पाच वर्षे पुरेल एवढा साखरेचा साठा सापडेल असा दावाही भोसले यांनी केला आहे. गेल्या दोन वर्षात उत्पादित झालेली साखर आणि केंद्र सरकारने दिलेल्या कोट्यातून वितरित झालेली साखर यामध्ये ४८ लाख टन साखरेची तफावत असल्याचा गंभीर आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सचिन पाटील यांनी केला आहे. कारखानदार आणि व्यापाऱ्यांनी ही साखर मागच्या दाराने नेपाळ, बांगलादेश आणि पाकिस्तानात काळ्या बाजारात विकल्याचा आरोपही पाटील यांनी केला आहे. कारखानदारांनी व्यापाऱ्याशी हातमिळवणी करत कागदोपत्री साखर विकल्याचे दाखवत असून अजूनही मोठ्या प्रमाणात साखर हे कारखान्याच्या गोडाऊनमध्ये शिल्लक आहे. केंद्र आणि राज्य सरकारने तातडीने अशा साखर कारखान्यांच्या गोदामांवर छापे टाकल्यास साखरेचा मोठा काळा बाजार उघड होईल असा दावा समाधान फाटे यांनी केला आहे. दरम्यान, साखरेला ७५ रुपये भाव मिळूनही अनेक कारखान्यांनी गेल्या हंगामात जाहीर केलेल्या साखरेचा दर अजूनही शेतकऱ्यांना दिला नाही. आता पहिल्यांदा हे पैसे वसूल केले जातील असे म्हणत यंदाच्या ऊस गाळप हंगामात आंदोलनाची दिशा काय असणार यासंदर्भातही शेतकरी संघटनांच्या बैठकीत चर्चा झाली.

---------------

### मराठा–ओबीसी वादात भुजबळांची

सरकारसाठी ही अत्यंत कठीण कसोटी ठरत आहे. दुसरीकडे, लक्ष्मण हाके यांच्यासह काही ओबीसी नेत्यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनाचा इशारा दिला असला, तरी भुजबळांच्या मवाळ भूमिकेमुळे ओबीसींच्या आक्रमक प्रतिआंदोलनाची धार काहीशी कमी होऊ शकते असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.



**मुंबईः येथे राज्यस्तरीय १७ वी कुडो कराटे व ७ वी मायर्स कप स्पर्धांमध्ये दोन रोप्य पद मिळाल्याबद्दल भूमी पवार यांचे जालना अप्पर पोलीस अधीक्षक मा.विक्रम साळी यांनी अभिनंदन केले.**

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६



## थोडक्यात

### वडवणीतील अनधिकृत पार्किंगला लगाम घाला –अमोल आंधळे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील वाढती वाहनसंख्या आणि त्यातच रस्त्यांवर होणारे अनधिकृत पार्किंग यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. शहरातील प्रमुख चौक व रस्त्यांच्या कडेला अस्ताव्यस्त वाहने उभी राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून, वाहनांना धक्का लागण्यावरून किरकोळ वादाचे प्रकारही घडत आहेत. त्यामुळे प्रशासनाने अनधिकृत पार्किंगवर तातडीने कारवाई करून शहरातील वाहतुकीसाठी रस्ते मोकळे करावेत, अशी मागणी डीसीसी बँकेचे संचालक तथा आदर्श फाउंडेशनचे कार्यवाहक अमोल दिनकरराव आंधळे यांनी केली आहे.यासंदर्भात पोलीस स्टेशन, नगरपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देण्यात आले आहे.



वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, वसंतराव नाईक चौक, जाधव कॉम्प्लेक्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक आणि चाटे चौक या परिसरात विशेषतः सकाळी व सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत वाहतुकीचा मोठा ताण निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शाळा–महाविद्यालये, बाजारपेठ आणि शासकीय कार्यालयांच्या परिसरातही रस्त्यावर वाहने उभी केल्याने कोंडीत भर पडत आहे. जाधव कॉम्प्लेक्स परिसरातील भारतीय स्टेट बँकेजवळ पार्किंगची पुरेशी व्यवस्था नसल्याने बँकेत येणारे नागरिक रस्त्यावर वाहने उभी करतात. त्यामुळे या ठिकाणी स्वतंत्र वाहनतळ उपलब्ध करून देणे अथवा शिस्तबद्ध पार्किंगचे नियोजन करणे गरजेचे आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिसरात कपड्याच्या दुकाने असल्याने किती देखील ग्राहकांच्या दुचाकी रस्त्यावर लावल्या जात असल्याने वाहतुकीची कोंडी होते त्यामुळे स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करणे गरजेचे असल्याचे अमोल आंधळे यांनी म्हटले आहे. वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा वेळ वाया जात असून विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह अत्यावश्यक सेवांनाही अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रमुख चौकांमध्ये गर्दीच्या वेळेत वाहतूक नियंत्रणासाठी मनुष्यबळ नियुक्त करावे, अनधिकृत पार्किंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि आवश्यक ठिकाणी नो–पार्किंग क्षेत्र निश्चित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. वडवणीची वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता केवळ कोंडी झाल्यानंतर कारवाई करण्या ऐवजी कायमस्वरूपी वाहतूक व पार्किंग व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. नगरपंचायत, पोलीस प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने समन्वयाने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना सुरक्षित, सुरळीत आणि कोंडीमुक्त वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी डीसीसी बँकेचे संचालक तथा आदर्श फाउंडेशनचे कार्यवाहक अमोल आंधळे यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

## प्रसूतीदरम्यानच्या कथित हलगर्जीपणाप्रकरणी दोषींवर फौजदारी कारवाई करा!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयातील माता व बाल रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल होणाऱ्या महिलांच्या उपचारादरम्यान कथित हलगर्जीपणाच्या घटना समोर येत असल्याचा आरोप करत, संबंधित प्रकरणातील दोषी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, तसेच त्यांची वैद्यकीय सनद रद्द करण्याबाबत नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली. या मागणीसाठी सोमवारी सकाळी जिल्हा रुग्णालयासमोर निदर्शने करण्यात आली.

छाया गणेश पांचाळ व शेख मुस्कान यांच्या प्रसूतीदरम्यान मृत्यूच्या घटनांसह वडवणी येथील १९ वर्षीय संध्या सुरज गायकवाड यांच्या सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर उद्भवलेल्या कथित गुंतागुंतीची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. संध्या गायकवाड यांच्या पोटात शस्त्रक्रियेदरम्यान वैद्यकीय साहित्य राहिल्यामुळे संसर्ग झाल्याचा आरोप असून, त्यांच्यावर पुणे येथील ससून रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

या कथित प्रकरणांमध्ये नेमकी वैद्यकीय जबाबदारी निश्चित करण्यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी. दोषी आढळणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायद्यानुसार फौजदारी कारवाई करावी आणि संबंधितांच्या वैद्यकीय परवान्याबाबत सक्षम प्राधिकरणामार्फत नियमानुसार निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

२४ कोटींच्या माता व बाल रुग्णालयात सुविधांचा प्रश्न




छाया पांचाळ, शेख मुस्कान व संध्या गायकवाड प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांच्या निलंबनाची मागणी; जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी यासाठी शासनाने कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. सुमारे २४ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या माता व बाल रुग्णालयातील कथित हलगर्जीपणाच्या घटनांमुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे डॉ. ढवळे यांनी म्हटले.

गेल्या महिन्यात शेख मुस्कान यांच्या प्रसूतीदरम्यान मृत्यूचे प्रकरण समोर आले होते. त्यानंतर संध्या गायकवाड यांच्या प्रकरणानेही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे केवळ चौकशी समिती स्थापन करून विषय प्रलंबित न ठेवता चौकशीचा अहवाल सार्वजनिक करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली.

यापूर्वीच्या घटनांचीही चौकशी करा

बीड जिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल महिलांच्या मृत्यूच्या यापूर्वीच्या घटनांचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. छाया पांचाळ व मुस्कान शेख यांच्या मृत्यूच्या घटनांनंतर नातेवाईक व सामाजिक संघटनांकडून कारवाईची मागणी करण्यात आली होती. मात्र, चौकशीच्या नावाखाली विलंब होत असल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला.

जिल्हा शल्यचिकित्सकांच्या निलंबनाची मागणी

वारंवार कथित हलगर्जीपणाच्या घटना समोर येत असल्याने संबंधित प्रकरणांची स्वतंत्र चौकशी पूर्ण होईपर्यंत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांना निलंबित करावे, अशी मागणी पालकमंत्री सुनेत्रा पवार तसेच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले. यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे ( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), सादेक सय्यद ( शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), बाळासाहेब मोरे पाटील ( शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष), किश्किंधा पांचाळ ( जिल्हाध्यक्ष विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज बीड), सुनिता पांचाळ, रामधन जमाले ( जिल्हाध्यक्ष इंटक बीड), ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे, हनुमान घोडके,प्रा.आबासाहेब जाधव,भीमराव कुटे , शंकर घाडगे, सरफराज खान रामचंद्र धुमाळ, विश्वास भोरे आदी सहभागी झाले.

## दशनाम गोसावी समाज परिषदेचे राज्यस्तरीय महाअधिवेशन बीडमध्ये

### समाजाच्या हक्क, अस्तित्व व विकासासाठी राज्यभरातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी

बीड, प्रतिनिधी

दशनाम गोसावी समाज परिषद, महाराष्ट्र राज्य व मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे राज्यस्तरीय महाअधिवेशन बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, नगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे.

या राज्यस्तरीय महाअधिवेशनात दशनाम गोसावी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व आर्थिक विकासाबरोबरच इनाम जमीन हक्क, समाजाचे अस्तित्व, सामाजिक न्याय आणि संघटनात्मक सक्षमीकरण या महत्त्वपूर्ण विषयांवर व्यापक चर्चा करण्यात येणार आहे.

अधिवेशनाच्या निमित्ताने आद्य जगद्गुरू शंकराचार्य यांच्या २० वा शतकातील महान संत–महंत व विद्वान व्यक्तींच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा, समाज जागृती प्रबोधन, राज्यस्तरीय पुरस्कार वितरण, गुणवंत विद्यार्थी व कर्मचारी सन्मान, महिला सन्मान सोहळा तसेच इनाम जमीन जनजागृतीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



अधिवेशनासाठी ह.भ.प. महंत नारायण महाराज गिरी (उजैनीपिंप्री) व ह.भ.प. महंत महादेव महाराज गिरी (चाकूरवाडी) यांची प्रमुख उद्घाटक म्हणून उपस्थिती राहणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. ॲड. जगदेवजी गिरी उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथींमध्ये मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, मा. ना. अतुलजी सावे, मा. आ. विजयसिंहजी पंडित, मा. आ. संदीपजी (भैय्या) क्षीरसागर, मा. आ. सुरेशरावजी (अण्णा) धस आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

तसेच शिवव्याख्याते श्री. यशवंत गोसावी सर व युवा वक्ते श्री. राहुल गिरी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजबांधवांचा राज्यस्तरीय जीवनगौरव, समाजमित्र, गोसावी समाजभूषण, आदर्श शिक्षक, अध्यात्मिक कार्यगौरव, आदर्श धार्मिक संस्कार कार्यगौरव व आदर्श महिला संस्था आदी पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे.

इनाम जमीन हक्कासाठी जनजागृती व धर्मध्वज मिरवणूक चे आयोजन

छत्रपती शिवाजी महाराज चौकातून धर्म ध्वज व आद्य गुरु शंकराचार्य ची मिरवणूक सकाळी ठीक १०:०० वाजता निघणार आहे.

मराठवाड्यासह महाराष्ट्रातील गुरव, गोसावी, ब्राह्मण, बैरागी व इतर इनामधारक बांधवांच्या जमीन, अस्तित्व व हक्कांच्या प्रश्नावर जनजागृती करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या माध्यमातून इनाम जमीन संदर्भातील हक्क व न्यायासाठी समाजबांधवांना संघटित करण्याचा निर्धार करण्यात येणार आहे.

राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी,संस्थापक अध्यक्ष राजेंद्र बन, जिल्हाध्यक्ष श्रीमहंत दत्तात्रय गिरी यांचे आवाहन

दशनाम गोसावी समाज परिषद, महाराष्ट्र राज्याचे राज्याध्यक्ष श्री. ओमप्रकाश गिरी यांनी महाराष्ट्रातील सर्व समाजबांधवांना आवाहन केले आहे की, हे अधिवेशन केवळ एक कार्यक्रम नसून आपल्या समाजाच्या हक्क, अस्तित्व, स्वाभिमान आणि भविष्यासाठी एकत्र येण्याची ऐतिहासिक संधी आहे. समाजातील प्रत्येक कुटुंबाने, युवकांनी, महिलांनी, विद्यार्थी, संत–महंत, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने बीड येथे उपस्थित राहून अधिवेशन यशस्वी करावे.

ते पुढे म्हणाले की, समाजाच्या विविध प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडण्यासाठी आणि पुढील दिशा निश्चित करण्यासाठी राज्यस्तरीय महाअधिवेशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील दशनाम गोसावी समाजबांधवांनी एकजुटीने या महाअधिवेशनात सहभागी व्हावे.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### म्हैस व दुचाकी चोरणारा

भारतीय न्याय संहिता) गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करत होती. दरम्यान, दि. २३ ऑगस्ट रोजी हा गुन्हा कारी येथील मुंजा मोरे याने केला असून तो सध्या म्हातारगाव येथे थांबल्याची गुप्त माहिती एलसीबी पथकाला मिळाली.

माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ म्हातारगाव येथे धाव घेऊन मुंजा मोरे याला दुचाकीसह ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवून चौकशी केली असता, त्याने सिरसाळा येथील म्हैस चोरीची कबुली दिली. अधिक विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता, त्याने केज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केवड येथूनही म्हैस चोरी केल्याचे उघड झाले. तसेच त्याच्या ताब्यात असलेली दुचाकी ही परंडा येथून चोरल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईमुळे पोस्टे सिरसाळा, पोस्टे केज आणि पोस्टे परंडा येथील चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. आरोपीकडून ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला सिरसाळा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही धडक कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोलीस अंमलदार बप्पासाहेब घोडके, महेश जोगदंड, जफर पठाण व गणेश मराडे यांच्या पथकाने केली.

### एकाचा अपघाताने

चालक म्हणून कार्यरत होते. ते मुंबई येथे असताना दि.२३ ऑगस्ट रोजी सकाळी अंघोळ करत असताना अचानक हृदयविकाराचा झटका आला. त्यातच त्यांचे निधन झाले.एकाच गावातील दोन व्यक्तींचा अल्पावधीत झालेला मृत्यु ग्रामस्थांसाठी धक्कादायक ठरला आहे. दोघांच्या निधनाने हिंगणी खुर्द गावावर शोककळा पसरली असून, ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### समता परिषदेच्या महिला बीड

नियुक्तपत्र देण्यात आले आहे. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष अविनाश उगले,डॉ. कुंडलिक खेत्री, माजलगाव तालुकाध्यक्ष जगन खेत्री, संतोष रासवे, दत्तात्रय गोंदणे, बापूराव गाडेकर, सचिन, राऊत मुकुंद शिनगारे डिगाबंर नाईकनवरे,कृष्णा शिंदे,सचिन अडसुळे,सावता काळे,धनंजय काळे,शहराध्यक्ष नितीन राऊत आदींची उपस्थिती होती. सौ. जयश्री खेत्री यांच्या निवडीबद्दल बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र अभिनंदन होत असून बीडच्या समता परिषदेच्या महीला जिल्हाध्यक्षा ह्या उच्च शिक्षीत आहेत म्हणून यापुढे समता परिषदेचे महिलांचे मजबूत संघटन निर्माण होईल असा विश्वास समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड.सुभाष राऊत यांनी व्यक्त केला आहे.

### माजलगाव नगर परिषदेत विरोधक

घ्यावी लागत आहे, असेही काँग्रेसने म्हटले.

सत्ताधारी पक्षातील अंतर्गत मतभेदांमुळे अद्याप विषय समित्यांच्या निवडी झालेल्या नाहीत. त्यामुळे शहराच्या विकासकामांवर परिणाम होत असून विकास रखडल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

या आंदोलनात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महावीर मस्के काका, जिल्हा सचिव सय्यद याकुब, अहमद भाई, रंगनाथ निकम, आफरोज तांबोळी, रशीद भाई, जानुशाह शेख, फारुक शेख, सलीम भाई, हुजेफा शेख, एजाज भाई, शेख मुस्तकीम, बाबा आलझेंडे, आरुण यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

या आंदोलनाला समाजवादी पक्षाचे नवीद भाई तसेच एमआय पक्षाचे इद्रीस भाई यांनी पाठिंबा दिला. दरम्यान, नगर परिषदेचे उपाध्यक्ष सहाल भैय्या चाऊस यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांच्या मागण्या जाणून घेतल्या. मागण्यांच्या सोडवणुकीबाबत सकारात्मक भूमिका घेत आश्वासन दिल्यानंतर त्यांच्या विनंतीवरून आंदोलन स्थगित करण्यात आले.

### गुन्हेगार दादा खिंडकर

करण्याचा तसेच समाजामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची बाब समोर आली आहे. मुद्दाम चेतावणीखोर व चिथावणीखोर वक्तव्ये करून वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचाही आरोप आहे. त्यामुळे या प्रकारातून मोठा वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची चर्चा सुरू आहे. दादा खिंडकर याच्याविरोधात यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे व कारवायांची नोंद आहे,हाफ मर्डरच्या गुन्ह्यात सुमारे १३ महिने कारावास भोगल्यानंतरही त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीत बदल झालेला नाही. जेलमधून बाहेर आल्यानंतरही पुन्हा सोशल मीडियाच्या माध्यमातून दहशत निर्माण करणे, प्रतिष्ठित व्यक्तींविरोधात आक्षेपार्ह वक्तव्ये करणे व दबावाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप या गुन्ह्यांत आहेत.

या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित आरोपींवर तात्काळ व कठोर कारवाई करण्यात यावी आणि समाजात दहशत व वादाचे वातावरण निर्माण करणाऱ्या अशा प्रवृत्तींना आळा घालावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## माजलगावात रोटरी क्लब व थावरे मल्टिस्पेशॅलिटी हॉस्पिटलच्या वतीने २७ ऑगस्टला मोफत आरोग्य तपासणी शिबिर–रो.डॉ.थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी जपत रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल व डॉ.थावरे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हृदयरोग, मधुमेह व इतर सर्वसाधारण आजारांवर मोफतआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे भव्य शिबिर शुक्रवार, दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत थावरे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल व क्रिटिकल केअर युनिट,गढी रोड रेणापूरी छत्रपती संभाजी महाराज चौका जवळ, माजलगाव येथे होणार आहे.या शिबिराचे उद्घाटन माजलगावचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे यांच्या शुभहस्ते होणार आहे.शिबिरात मोफत तपासणी

या शिबिरात नागरिकांसाठी प्राथमिक हृदयरोग तपासणी व तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मोफत मिळणार असून,त्याच बरोबर खालील महत्त्वाच्या तपासण्या पूर्णपणे मोफत केल्या जाणार आहेत.

ज्यात इईसीजी हृदयाची तपासणी,रक्तदाब तपासणी,रक्तातील शुगर तपासणी (रँडम, जेवणा अगोदर व जेवणानंतरची), (मागील तीन महिन्यातील सरासरी साखर तपासणी), कोलेस्ट्रॉल तपासणी, (थायरॉईड तपासणी,इतर सर्वसाधारण आजारांची प्राथमिक तपासणी होणार आहे

सध्या बदलत्या जीवनशैलीमुळे हृदयरोग, मधुमेह, रक्तदाब आणि थायरॉईड सारख्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. मात्र अनेक कारणांसह आर्थिक बाबीमुळे अनेकजण वेळेवर तपासणी करत नाहीत. ही गरज ओळखून रोटरी क्लब व डॉ.थावरे हॉस्पिटलने हा सामाजिक उपक्रम म्हणून हे शिबीर आयोजित केले आहे. रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रलचे अध्यक्ष रो. प्रभाकर शेटे,सचिव रो. अंकुश राठोड आणि प्रोजेक्ट चेअरमन रो.डॉ. धनंजय थावरे यांनी माजलगाव परिसर व तालुक्यातील जास्तीत जास्त सर्वसामान्य रुग्णांनी गुरुवार २७ ऑगस्ट रोजी माजलगाव येथे आयोजित केलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले आहे.

## आधार नोंदणी, दुरुस्ती, अपडेटसाठी जाणाऱ्या लोकांचे हाल होऊ लागले, तासन्तास रांगा

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना आधार कार्ड नोंदणी, आधारमधील दुरुस्ती व अद्ययावत करण्यासाठी डाक विभागाच्या आधार केंद्रांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत आहे. मात्र, आधार केंद्रांवरील वाढती गर्दी आणि मर्यादित कामकाजाच्या वेळेमुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषत: वयोवृद्ध नागरिक, महिला, लहान मुले, दिव्यांग व्यक्ती, विद्यार्थी तसेच कामानिमित्त दिवसभर घराबाहेर असलेल्या नागरिकांना आधार सेवेसाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. अनेक वेळा गर्दीमुळे नंबर न लागल्याने नागरिकांना पुन्हा केंद्रावर येण्याची वेळ येत असून, त्यांना आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.



पोस्ट कार्यालयातील आधार नोंदणीच्या कामकाजाची वेळ वाढवावी

समाजसेवक जे. डी. शाह यांची केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे मागणी

या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील सर्व डाक कार्यालयांमधील आधार नोंदणी व अद्ययावत केंद्रांची कामकाजाची वेळ वाढवून दोन सत्रांमध्ये (सकाळी व संध्याकाळी) आधार सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी समाजसेवक जे. डी. शाह यांनी केंद्रीय दूरसंचार तथा टपाल खात्याचे मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे ई–मेलद्वारे पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

आधार कार्ड हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अत्यंत महत्त्वाचे ओळखपत्र असून विविध शासकीय योजना, शैक्षणिक कामे, बँकिंग सेवा तसेच इतर अनेक आवश्यक प्रक्रियांसाठी आधारची आवश्यकता भासते. त्यामुळे आधार केंद्रांवरील गर्दी कमी करून नागरिकांना अधिक वेळेत आणि सुलभ पद्धतीने सेवा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

तसेच, वयोवृद्ध, महिला आणि दिव्यांग नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी आधार केंद्रांची कामकाजाची वेळ वाढवून त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

### जाहीर प्रगटन

मा. श्री. प्रविण आर. शिंदे दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क. १३८४/२०२६

**ॲड.जी.एस.घुगे**

**ज्ञानेश्वरी भ्र. अंगद पटाईत व इतर वि. निरंक**

अर्जदार –१. ज्ञानेश्वरी भ्र. अंगद पटाईत, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळनेर ता.जि.बीड २. अदित्य पि. अंगद पटाईत, वय–१६ वर्षे, धंदा–शिक्षण, अ.पा.क. अर्जदार क्र.१ आई रा. सदर ३. नंदिनी पि. अंगद पटाईत, वय–१२ वर्षे, धंदा–शिक्षण, अ.पा.क. अर्जदार क.१ आई रा.सदर ४. सुमन भ्र. जगन्नाथ पटाईत, वय ६२ वर्षे, धंदा–निरंक, रा.सदर

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत अंगद जगन्नाथ पटाईत यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत मयत अंगद जगन्नाथ पटाईत हे दिनांक ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ६:३० वाजणेच्याा दरम्यान नागापूर फाटया जवळ मोटार सायकल क्र MH-23.R.8027 या गाडी ने धडक दिल्याने रोडवर खाली पडून डोक्याला व ईतर ठिकाणी मार लागुन मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क. ३ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार क. ४ ही मयताची आई आहे. अर्जदारांशिवाय मयतास ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मयत अंगद जगन्नाथ पटाईत रा. पिंपळनेर ता.जि. बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुनघोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख १५/१०/२०२६.

आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**आदेशावरुन**

**स्वाक्षरित/–** **स्वाक्षरित/–**

**कनिष्ठ लिपीक** **अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर बीड**

### जाहीर प्रगटन

मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,पाटोदा पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात,

किरकोळ दिवाणी अर्ज २९८/२०२६ महेश व इतर विरुद्ध निरंक

**मार्फत ॲड. एस. आर. नागरगोजे**

अर्जदार १. महेश राजेंद्र थोरवे रा.भराटवाडी ता.पाटोदा जि.बीड ह.मु. फलोर नं.आर.एख १० स्कायवेज वृदांवन चोवीसवाडी चऱ्हाली बु.चारोही बीके चारोळी बु. पुणे २. शुभांगी राजेंद्र थोरवे लग्नापूर्वीचे शुभांगी किरण मिसाळ लग्नानंतरचे रा.भराटवाडी ता. पाटोदा जि.बीड ह.मु.खोकरमोहा ता.शिरूर का.जि.बीड ३. अंकिता राजेंद्र थोरवे लग्नापूर्वीचे अंकिता जालिंदर सांगळे लग्नानंतरचे रा.भराटवाडी ता.पाटोदा जि.बीड ह. मु. सांगळवाडी ता. शिरुर का, जि. बीड

विरुद्ध कोणीही नाही

मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शोभा राजेंद्र थोरवे ह्या मौजे भराटवाडी ता.पादोदा जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे

ज्याअर्थी शोभा राजेंद्र थोरवे यांचा मृत्यु दिनांक १५/०७/२०२६ रोजी डोंगरकिन्ही ता.पाटोदा जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ हे मयताचे मुलगा असून अर्जदार क्र.२ व ३ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहू मयत शोभा राजेंद्र थोरवे यांचे वारस असल्याबाबत प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २४ सप्टेंबर २०२६

**आदेशावरुन**

**स्वाक्षरित/–** **स्वाक्षरित/– सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय,**

**कनिष्ठ लिपीक** **क.स्तर पाटोदा ता.जि.बीड**

## भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अभ्यासिका केंद्राची दुरवस्था

### विद्यार्थ्यांच्या सुविधांकडे नगरपंचायतीचे दुर्लक्ष

पाटोदा । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी हक्काची जागा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने उभारण्यात आलेले भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अभ्यासिका इमारतीची नियमित देखभाल, आवश्यक दुरुस्ती, वीज–पाणी, फर्निचर आणि सुरक्षिततेची व्यवस्था करून अभ्यासिका तातडीने सुरू करणे अपेक्षित असताना प्रशासनाच्या उदासीनतेमुळे विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नसल्याची भावना आहे.

विशेष म्हणजे, इमारत दीर्घकाळ




केंद्र आजही प्रत्यक्ष उपयोगात येत नसल्याने पाटोदा नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इमारत उभारून कित्येक वर्षे लोटली, मात्र विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करण्याबाबत ठोस पावले उचलली जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्पर्धा परीक्षा, चझडउ, णझडउ तसेच विविध शासकीय आणि खासगी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शांत व सुरक्षित अभ्यासाची जागा मिळणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली ही इमारत वर्षानुवर्षे वापराविना पडून असल्याचे चित्र दिसत आहे.

‘इमारत बांधली, पण विद्यार्थ्यांच्या उपयोगाची कधी?’ असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सार्वजनिक निधीतून उभारलेल्या सुविधेचा योग्य वापर न झाल्यास त्यामागील उद्देशच फोल ठरतो. बंद व वापराविना राहिल्यास तिच्या सुरक्षिततेबाबतही प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे नगरपंचायतीने केवळ आश्वासने न देता इमारतीची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी आणि अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी सुरू करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

नगरपंचायतीने उत्तर द्यावे!

अभ्यासिका केंद्र नेमके कधी सुरू होणार? इमारतीच्या देखभालीसाठी आतापर्यंत काय उपाययोजना करण्यात आल्या? विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा कधी उपलब्ध करून देणार? या प्रश्नांची उत्तरे पाटोदा नगरपंचायतीने नागरिकांसमोर स्पष्ट करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेली ही सुविधा वर्षानुवर्षे धूळ खात पडून राहणे ही गंभीर बाब असून, नगरपंचायतीने आता तरी झोपेतून जागे होऊन अभ्यासिका तातडीने सुरू करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांसह पालक व नागरिकांतून होत आहे.

cmyk

# ॲग्रीस्टॅकच्या नोंदणीत ७१ टक्के जमीनधारक; ४० टक्के पीक क्षेत्र अद्याप फार्मर आयडीविना

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

देशातील डिजिटल कृषी व्यवस्थेला गती देण्यासाठी केंद्र सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या ॲग्रीस्टॅक आणि फार्मर रजिस्ट्रीच्या कामाचा आढावा नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेत घेण्यात आला. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह विविध राज्यांचे कृषिमंत्री आणि वरिष्ठ अधिकारी या परिषदेला उपस्थित होते. देशातील १४ कोटी ६४ लाख जमीनधारकांपैकी आतापर्यंत १० कोटी ४२ लाख जमीनधारकांना फार्मर आयडी देण्यात आल्याची माहिती या वेळी देण्यात आली. मात्र, अद्याप सुमारे ४० टक्के पीक क्षेत्र फार्मर आयडीच्या नोंदणीपासून दूर असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

२०१५-१६च्या कृषी गणनेनुसार देशात १४ कोटी ६४ लाख जमीनधारक आहेत. त्यापैकी १० कोटी ४२ लाख जमीनधारकांची फार्मर आयडीसाठी नोंदणी झाली असून, हे प्रमाण सुमारे ७१ टक्के आहे. देशातील सुमारे १४ कोटी जमीनधारकांना फार्मर आयडी देण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी सर्व राज्यांकडून वेगाने काम सुरू असल्याचे कृषिमंत्री चौहान यांनी सांगितले. फार्मर आयडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कृषी योजनांशी जोडण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात शासकीय योजनांचा लाभ, कृषी सेवा आणि विविध अनुदाने शेतकऱ्यांपर्यंत अधिक अचूकपणे पोहोचविण्यासाठी




या डिजिटल नोंदणीला महत्त्व प्राप्त झाले आहे.ङ्गकुळवहिवाटदारांच्या नोंदणीचे मोठे आव्हान दरम्यान, प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांची फार्मर रजिस्ट्रीमध्ये नोंदणी करण्यास अनेक अडचणी येत असल्याचे परिषदेत समोर आले. कुळवहिवाटदार, भाडेकरू तसेच इतर प्रकारे जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांची नोंद कशी करावी, यासाठी अद्याप २२ राज्यांनी प्रमाणित कार्यपद्धती तयार केलेली नाही. त्यामुळे जमीन नावावर नसली तरी प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना डिजिटल कृषी व्यवस्थेत समाविष्ट करण्याचे आव्हान कायम आहे. याशिवाय किमान १४ राज्यांनी जमीन हक्क नोंदवही आणि फार्मर रजिस्ट्री यांची जोडणी केलेली नाही. त्यामुळे जमीनधारक कोण आणि प्रत्यक्ष शेती करणारा शेतकरी कोण, याची माहिती डिजिटल प्रणालीत अचूकपणे जोडण्याची प्रक्रिया काही राज्यांमध्ये अद्याप अपूर्ण आहे.

या राष्ट्रीय परिषदेत कडधान्य आत्मनिर्भर अभियानाचाही आढावा घेण्यात आला. २०२५-२६ मध्ये देशातील कडधान्य उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ६ टक्क्यांची वाढ झाली आहे. मात्र, देशातील १० राज्यांमध्ये कडधान्यांच्या लागवड क्षेत्रात वाढ झालेली नाही किंवा क्षेत्र घटले आहे. यापैकी सात राज्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत कडधान्यांचे उत्पादनही कमी झाले आहे. रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये उच्च उत्पादनक्षम कडधान्य वाणांच्या बियाण्यांचे ४ लाख ६० हजार क्विंटल वितरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात ३ लाख १० हजार क्विंटल बियाण्यांचेच वितरण झाले. म्हणजेच निर्धारित उद्दिष्टाच्या सुमारे दोन तृतीयांश बियाण्यांचे वितरण करण्यात आले. २०२६-२७ च्या खरीप हंगामातही उच्च उत्पादनक्षम वाणांच्या बियाण्यांच्या वापराबाबत काही राज्यांमध्ये अपेक्षित प्रगती झालेली नसल्याचे स्पष्ट झाले. देशभरात वितरित करण्यात आलेल्या बियाण्यांपैकी सरासरी ८२ टक्के बियाण्यांचा वापर झाला आहे. मात्र, सात राज्यांमध्ये उच्च उत्पादनक्षम वाणांच्या बियाण्यांचा वापर ३५ टक्क्यांपेक्षाही कमी राहिला आहे. ॲग्रीस्टॅकच्या माध्यमातून डिजिटल कृषी व्यवस्थेला चालना देतानाच प्रत्यक्ष शेती करणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याची नोंदणी, जमीन हक्कांची अचूक जोडणी आणि उच्च उत्पादनक्षम बियाण्यांचा प्रभावी वापर ही केंद्र आणि राज्य सरकारांसमोरील प्रमुख आव्हाने असल्याचे या परिषदेतून स्पष्ट झाले.

## आता घरीच तपासू शकता, जनावरांचा स्तनदाह!

स्तनदाह हा पशुपालनातील सर्वाधिक आर्थिक हानी करणारा आजार आहे. स्तनदाह या आजाराला ग्रामीण भाषेत 'दगडी' आणि इंग्रजीमध्ये 'मस्टायटीस' या नावाने ओळखले जाते. दुभत्या जनावरांना होणार्या या आजारामुळे पशुपालकांना खूप नुकसान सहन करावे लागते. परंतु या आजारावर एक आनंदाची बातमी आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूर यांनी आधुनिक संशोधन केलेले एक नवीन किट विकसित केली आहे. 'लॅटरल फ्लो इम्युनोसे स्ट्रिप अँड मेथड फॉर डिटेक्शन ऑफ मॅस्टिटिस इन बोवाइन्स' या नावाच्या संशोधित किट द्वारे आता अवघ्या काही मिनिटात स्तनदाहचे निदान करता येणे शक्य होणार आहे. या किटचे संशोधन रसायन अभियांत्रिकी विभाग, आयआयटी कानपूर आणि राष्ट्रीय केंद्राचे प्रा. सिद्धार्थ पांडा आणि डॉ. सत्येंद्र कुमार, वरिष्ठ प्रकल्प शास्त्रज्ञ, कानपूर यांनी केले आहे. या तंत्रज्ञानाला भारतीय पेटंट कार्यालयाने भारतीय पेटंट क्रमांक ४५५२३२ ने मंजूर दिली असून, पॉलीक्लोनल अँटीबॉडी आणि स्ट्रिप चाचणीच्या




रूपात नवीन डिझाइन वापरून ही किट तयार करण्यात आली आहे. दुभत्या जनावरांमध्ये स्तनदाह शोधण्यात क्रांती घडवून आणण्याचे या अभिनव तंत्रज्ञानाचे उद्दिष्ट आहे. त्याचा व्यापक वापर सुलभ करण्यासाठी डेअरी उत्पादक कंपनीसोबत तंत्रज्ञान हस्तांतरण सामंजस्य करार देखील पूर्ण केला गेला आहे. स्तनदाह (मस्टायटीस) हे डेअरी उद्योगांमध्ये आर्थिक नुकसानीचे एक प्रमुख कारण मानले जाते, ज्यामुळे दुधाचे उत्पादन कमी होते. तसेच दुधाची गुणवत्ता देखील खराब होते. या रोगामध्ये स्तन ग्रंथी व कासेच्या ऊतीमध्ये एक दाहक क्रिया घडते जी शारीरिक आघात किंवा सूक्ष्मजीव संसर्गामुळे होते. ज्यामुळे पशुपालकाची मोठी आर्थिक होत असते. अशावेळी ही संशोधित किट वापरून अवघ्या काही वेळात स्तनदाहचे निदान करणे सोपे होणार आहे.

किटद्वारे अशी होते तपासणी : या किटमध्ये दुधाचे काही थेंब टाकल्यावर अवघ्या काही क्षणात मस्टायटीसचे निदान होते. हाताळणीस सोप्या असलेल्या या किटद्वारे पशुपालक देखील सहजरित्या मस्टायटीसचे निदान करू शकतात.

## जमिनीनुसार करा खरीप पिकांसाठी खतांची निवड!

पिकांना खते ही लागवडीपासून ते वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत द्यावी लागतात. पिकांच्या विविध अवस्थेमध्ये वेगवेगळ्या अन्नद्रव्याची आवश्यकता असते. त्यानुसार खताचे व्यवस्थापन करणे फायदेशीर ठरते. मृदा परीक्षणानुसार पिकांना खते देण्याची शिफारस करण्यात येते. यामध्ये स्फुरद पालाशयुक्त खते पिकास उपलब्ध होण्यास वेळ लागतो, त्यामुळे संपूर्ण मात्रा पिक पेरणीच्या वेळेस द्यावी, तसेच आवश्यकता असल्यास त्यांच्या विद्राव्य स्वरुपातील खतांची वेळ फुलोर्‍याची वेळ, दाणे भरणे वेळेस विद्राव्य खताच्या फवारणीचे अधिक फायदे होतात. नत्रयुक्त खताचा ऱ्हास लवकर होत असल्यामुळे त्यांची आवश्यकतेनुसार दोन ते तीन भागात विभागणी करून त्याची मात्रा पिकात द्यावी.

खतांची निवड : खरीप पिकांसाठी मातीचा प्रकार व पीक यानुसार खताची निवड करावी. माती तपासणीमुळे जमिनीची सुपीकता व गुणदोष याबाबतची माहिती मिळते. जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा सामू, सेंद्रिय कर्ब, विद्राव्य क्षारांचे प्रमाण इ. नुसार कोणत्या अन्नद्रव्यांची किती गरज आहे. यांचे प्रमाण ठरवता येते म्हणजेच जमिनीचे आरोग्य समजते. बाजारामध्ये अनेक प्रकारची खते उपलब्ध आहेत. परंतु कोणत्या खतांमध्ये कोणत्या अन्नद्रव्याचे किती प्रमाण व ते कोणत्या स्वरुपात आहे हे पाहून आपल्या पिकासाठी व जमिनीसाठी योग्य आहे का हे पडताळून पाहणे आवश्यक आहे. अशा प्रकारे केलेला खतांचा वापर मूलभूत शिफारशीपेक्षा जास्त परिणामकारक ठरतो व अनावश्यक खतांचा वापर टाळता येऊ शकतो.




जमीन आणि पिकांनुसार खतांचा वापर : पाणी साचलेल्या जमिनीत नायट्रेटयुक्त खते होत नाही. ज्या जमिनीत गंधकाचे प्रमाण कमी आहे अशा जमिनीत अमोनियम सल्फेट किंवा सिंगल सुपर फॉस्फेट या सारख्या गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर करावा. डाळवर्गीय व गळीत पिकांमध्ये गंधकाची आवश्यकता जास्त असते अशा पिकास गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर जास्त करावा. क्षारयुक्त जमिनीत युरीया वापरल्यास त्याचे नायट्रेटमध्ये रुपांतर होण्यास विलंब लागतो, परंतु नायट्रेट जमिनीत राहिल्यास पिकास अपायकारक ठरतो. म्हणून अशा जमिनीत युरिया ऐवजी अमोनियम नायट्रेट वापरावे. आम्लयुक्त जमिनी सोडून इतर जमिनीत पाण्यात विद्राव्य असलेल्या स्फुरदयुक्त खते वापरावीत. उदा. सिंगल सुपर फॉस्फेट. माती तपासणी अहवालात सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आल्यास शिफारसीनुसार सूक्ष्म अन्नद्रव्याची मात्रा सुध्दा द्यावी, कारण ही अन्नद्रव्ये सुध्दा मुख्य व दुय्यम अन्नद्रव्याइतकीच महत्त्वाची असतात.

## इंद्रधनुषी मशरूमची शेती शेतकऱ्यांसाठी शाश्वत मार्ग

शतकानुशतके, मशरूमला त्यांच्या चव, पोषण आणि औषधी गुणधर्मांसाठी महत्त्व दिले गेले आहे. अलिकडच्या वर्षांत, भारतात आणि जगभरात मशरूम लागवडीकडे एक शाश्वत कृषी उपक्रम म्हणून अधिक लक्ष वेधले जात आहे, जो कमी जागेतही उत्पन्न मिळवून देतो. मशरूम शेतीच्या अनेक प्रकारांपैकी, इंद्रधनुषी मशरूमची शेती आता एक नवीन ट्रेंड म्हणून उदयास येत आहे, जो सौंदर्य, आरोग्य आणि नफा यांचा मेळ घालतो. पारंपरिक पांढऱ्या किंवा ऑयस्टर मशरूमच्या विपरीत, इंद्रधनुषी मशरूम सोनेरी पिवळा, गुलाबी, निळा, हिरवा, लाल, तपकिरी आणि पांढरा अशा विविध नैसर्गिक रंगांमध्ये आढळतात. हे तेजस्वी रंग केवळ दिसायलाच आकर्षक नाहीत, तर ते महत्त्वपूर्ण पोषक तत्वे आणि औषधी संयुगांच्या उपस्थितीचेही सूचक आहेत. लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी इंद्रधनुषी मशरूमची शेती आशेचा किरण आहे, कारण ती मर्यादित संसाधनांमध्ये करता येते. गवत, भुसा आणि लाकडाचा भुसा यांसारख्या शेतीतील कचऱ्यावर मशरूम वाढवता येत असल्यामुळे, ही लागवड प्रक्रिया कमी खर्चाची आणि पर्यावरणपूरक आहे. त्याचबरोबर, सामान्य प्रकारच्या मशरूमच्या तुलनेत रंगीत मशरूमचे बाजारमूल्य लक्षणीयरीत्या जास्त असते, ज्यामुळे शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाच्या उत्तम संधी निर्माण होतात.

इंद्रधनुषी मशरूमची खास वैशिष्ट्ये : इंद्रधनुषी मशरूमच्या प्रत्येक प्रकाराची स्वतःची चव, पोत आणि पौष्टिक वैशिष्ट्ये असतात. उदाहरणार्थ, सोनेरी-पिवळ्या ऑयस्टर मशरूममध्ये नाजूक खमंग चव आणि उत्कृष्ट अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, तर गुलाबी ऑयस्टर मशरूममध्ये सौम्य मांसल चव असते, जी स्टर-फ्रायसाठी योग्य आहे. निळ्या ऑयस्टर मशरूममध्ये प्रथिने भरपूर असतात,



आणि हिरवे रसुला मशरूम त्यांच्या खमंग चवीने एक खास चव देतात. लाल रेशी मशरूम विशेषतः त्यांच्या औषधी गुणधर्मांसाठी ओळखले जातात आणि रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यासाठी व तणाव कमी करण्यासाठी चहा आणि सप्लिमेंट्समध्ये त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. तपकिरी किंवा वुड इअर मशरूममध्ये फायबर भरपूर असते आणि ते त्यांच्या चिवट पोतासाठी ओळखले जातात, ज्यामुळे ते आशियाई खाद्यसंस्कृतीत लोकप्रिय आहेत. पौष्टिकतेच्या दृष्टीने, इंद्रधनुषी मशरूममध्ये प्रथिने, आहारातील तंतुमय पदार्थ (फायबर), अँटिऑक्सिडंट्स, बी व डी सारखी आवश्यक जीवनसत्त्वे आणि पोटॅशियम व झिंक सारखी खनिजे भरपूर प्रमाणात असतात. या आरोग्यदायी फायद्यांमुळे आजच्या आरोग्य-जागरूक समाजात त्यांना प्रचंड मागणी आहे.

इंद्रधनुषी मशरूमची लागवड पद्धत : इंद्रधनुषी मशरूमच्या लागवडीसाठी काही काळजी घेणे आवश्यक असते, परंतु योग्य प्रशिक्षणाने ते सहजपणे सांभाळता येते. शेतकऱ्यांनी सर्वप्रथम त्यांच्या स्थानिक हवामानासाठी योग्य असलेल्या प्रजाती निवडणे आवश्यक आहे. उष्ण प्रदेश सोनेरी-पिवळे, गुलाबी ऑयस्टर आणि वुड इअर मशरूमसाठी उत्तम असतात, तर थंड प्रदेशात निळे ऑयस्टर, हिरवे रसुला आणि पांढरे ऑयस्टर मशरूम वाढतात. पुढील पायरी म्हणजे निर्जंतुक केलेल्या पेंढा किंवा लाकूड भुसामध्ये मशरूमचे बी (स्पॉन) मिसळून स्पॉन बॅग तयार करणे. योग्य वाढीसाठी या बॅग योग्य तापमान आणि आर्द्रतेमध्ये ठेवणे आवश्यक असते, साधारणपणे २०-३० तापमान आणि ८०-९० टक्के आर्द्रता. १०-२० दिवसांच्या आत, मशरूम सब्सट्रेटवर वाढू लागतात. त्यानंतर मशरूमला फळे येतात आणि उत्तम चव व पौष्टिक गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी शेतकरी मशरूम पूर्ण परिपक्व झाल्यावर त्यांची काढणी करू शकतात. संसर्ग टाळण्यासाठी नियमित सिंचन आणि स्वच्छता राखणे महत्त्वाचे आहे. मशरूम नाजूक असल्याने त्यांची काढणी काळजीपूर्वक करावी. ताजे मशरूम थेट बाजारात विकले जाऊ शकतात, तर अतिरिक्त पीक वाळवून किंवा त्यावर प्रक्रिया करून मूल्यवर्धित उत्पादने बनवता येतात , ज्यामुळे नासाडीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही.

आर्थिक संधी आणि बाजारपेठेतील मागणी : इंद्रधनुषी मशरूमच्या शेतीचे खर्च-लाभ विश्लेषण त्याची नफाक्षमता दर्शवते. उदाहरणार्थ, प्रति किलो उत्पादनासाठी सुमारे १०० रुपये गुंतवणुकीसह, पांढरे ऑयस्टर मशरूम ४५० रुपये प्रति किलो दराने विकले जाऊ शकतात, ज्यामुळे शेतकऱ्यांना प्रति किलो सुमारे ३५० रुपयांचा नफा मिळतो. सोनेरी ऑयस्टर, गुलाबी ऑयस्टर आणि निळे ऑयस्टर मशरूममधूनही असाच परतावा मिळतो, तर रेशीसारखे उच्च-मूल्याचे मशरूम कमी उत्पन्न असूनही अपवादात्मक नफा देतात. केवळ शहरी रेस्टॉरंट्स आणि सेंद्रिय दुकानांमध्येच नव्हे, तर जागतिक आरोग्य उद्योगातही रंगीबेरंगी मशरूमची मागणी वाढत आहे. अधिकाधिक लोक निरोगी जीवनशैलीचा अवलंब करत असल्याने, पोषण आणि औषधी गुणधर्म दोन्ही देणाऱ्या मशरूमला मोठी मागणी आहे. शेतकऱ्यांसाठी, याचा अर्थ उत्तम बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याची आणि चांगले उत्पन्न मिळवण्याची नवीन संधी आहे.




### महत्वाच्या घटना

१६०९ : गॅलेलिओ गॅलिली याने जगातील पहिल्या दुर्बिणीचे प्रात्यक्षिक दाखवले.
१८२५ : उरुग्वेने आपण (ब्राझिलपासुन) स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.
१९१९ : जगातील पहिली प्रवासी विमानसेवा लंडन ते पॅरिस या शहरांदरम्यान सुरू झाली.
१९४४ : दुसरे महायुद्ध  दोस्त राष्ट्रांनी पॅरिस स्वतंत्र केले.
१९५७ : जयपूर येथील दिवंगत महाराजा सवाई मान सिंग द्वितीय यांच्या नेतृत्वाखाली भारतीय पोलो संघाने फ्रांस मध्ये आयोजित विश्वकप जिंकला.
१९६० : इटलीतील रोम येथे १७ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९८० : झिम्बाब्वेचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९१ : एअरबस ए-३२० ने पहिले उड्डाण केले.
१९९१ : बेलारुसने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.
१९९१ : लिनस ट्रोव्हाल्डस याने 'लिनक्स' या संगणक प्रणालीची पहिली आवृत्ती प्रकाशित केली.
१९९७ : दक्षिण कन्नडा जिल्ह्याचे विभाजन करुन 'उडुपी' हा स्वतंत्र जिल्हा निर्माण करण्यात आला.
१९९८ : एनसायकक्लोपिडिया ब्रिटानिका या जगप्रसिद्ध विश्वकोशाच्या संपादकीय आवृत्तीच्या आयातीवर भारत सरकारने बंदी घातली. या आवृत्तीतील भारताच्या सीमा चुकीच्या दाखवल्यामुळे तसेच जम्मू काश्मीर राज्याविषयी चुकीची माहिती दिल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.
२००१ : सरोदवादक अमजद अली खाँ यांना मध्य प्रदेश सरकारचा तानसेन पुरस्कार जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९२३ : गंगाधर गाडगीळ  साहित्यिक, समीक्षक व अर्थतज्ञ, ५६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (मृत्यू: १५ सप्टेंबर २००८)
१९२६ : भारतीय लोकसभा सदस्य बाबुराव काळे यांचा जन्मदिन.
१९३० : शॉन कॉनरी  'जेम्स बॉन्ड'च्या भूमिकांमुळे गाजलेला स्कॉटिश अभिनेता व निर्माता
१९३६ : इमेज इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड मॅनेजमेंट चे संस्थापक गिरिधारीलाल केडिया यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर २००९)
१९४१ : अशोक पत्की  राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय संगीत दिग्दर्शक आणि संगीतकार तसचं, ''मिले सूर मेरा तुम्हारा'', ''पूरब से सूर्य उगा'' या गीताचे रचनाकार
१९५२ : दुलीप मेंडिस  श्रीलंकेचा क्रिकेटपटू
१९५२ : भारतीय राजकारणी आणि माजी चित्रपट अभिनेते तसचं, तामिळनाडू विधानसभेतील माजी विरोधी पक्षनेते विजयकांत यांचा जन्मदिन.
१९५७ : सिकंदर बख्त  पाकिस्तानी जलदगती गोलंदाज
१९६२ : डॉ. तस्लिमा नसरीन  बांगलादेशी स्त्रीमुक्तीवादी लेखिका
१९६५ : भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक संजीव शर्मा यांचा जन्म.
१९६९ : भारतीय क्रिकेटपटू विवेक राजदान यांचा जन्म.
१९९४ : भारतीय लेखक आणि कादंबरीकार काजोल आयकट यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२७० : लुई (नववा)  फ्रान्सचा राजा (जन्म: २५ एप्रिल १२१४)
१८१९ : जेम्स वॉट  स्कॉटिश संशोधक व यंत्र अभियंता (जन्म: १९ जानेवारी १७३६)
१८२२ : विल्यम हर्षेल  जर्मन/ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ व संगीतकार. १७३८ मधे त्याने युरेनस ग्रहाचा शोध लावला. (जन्म: १५ नोव्हेंबर १७३८)
१८६७ : मायकेल फॅरेडे  विद्युत चुंबकीय यंत्राचा शोध लावणारे ब्रिटीश भौतिकशास्त्रज्ञ व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २२ सप्टेंबर १७९१)
१९०८ : हेन्री बेक्वेरेल  नोबेल पारितोषिक विजेते (१९०३) फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक (जन्म: १५ डिसेंबर १८५२). नोबल पारितोषिक पुरस्कार सन्मानित किरणोत्सारी वर्गाचा शोध लावणारे महान फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ व अभियंता.
१९७२ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी आणि भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते हरिभाऊ उपाध्याय यांचे निधन.
२००० : कार्ल बार्क्स  सुमारे तीन दशके 'डोनाल्ड डक'ची रुपरेखा चितारुन त्याला जगभर प्रचंड लोकप्रियता मिळवून देणारे हास्यचित्रकार (जन्म: २७ मार्च १९०१)
२००१ : डॉ. वसंत दिगंबर तथा व. दि. कुलकर्णी  संतसाहित्याचे गाढे अभ्यासक व समीक्षक. त्यांचे 'धुळाक्षरातून मुळाक्षराकडे' हे आत्मचरित्र एका वेगळ्या स्वरुपामुळे गाजले.
२००१ : असित सेन हिंदी व बंगालीतील अभिनेते, दिग्दर्शक, पटकथालेखक व छायालेखक (जन्म: २४ सप्टेंबर १९२२)
२००८ : सईद अहमद शाह ऊर्फ 'अहमद फराज'  ऊर्दू शायर (जन्म: १२ जानेवारी १९३१)
२०१२ : नील आर्मस्ट्राँग  चंद्रावर पाऊल ठेवलेला पहिला मानव (जन्म: ५ ऑगस्ट १९३०)
२०१३ : भारतीय गायक-गीतकार रघुनाथ पनिग्राही यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १९३२)
२०१८ : जॉन मैककेन, जॉन सिडनी मॅक्केन तिसरा हा एक अमेरिकन राजकारणी व ॲरिझोना राज्यातून वरिष्ठ सेनेटर. (जन्मतारीख: २९ ऑगस्ट, १९३६)







# शासकीय सेवेत असतानाही खासगीत सिझर; बाळातणीचा मृत्यू

## डॉ. अनिता अलगुले यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल

लातूर। प्रतिनिधी

शासकीय सेवेत असताना, खासगीत प्रॅक्टीस करणे गुन्हा असताना, नोंदणी नसलेल्या हॉस्पीटलमध्ये एका मातेचे बाळांतपणावेळी सिझर केले. त्यात बाळांतणीचा मृत्यू झाला म्हणून लातूरच्या आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या डॉ. अनित बब्रुवान अलगुले, रा. रेड्डी मॅटर्निटी व जनरल हॉस्पीटल नवीन रेणापूर नाका, अंबाजोगाई रोड लातूर यांच्या विरोधात विविध कलमान्वय विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ. अनिता अलगुले या शासनाच्या सेवेत डॉक्टर म्हणून कार्यरत आहेत. शासकीय सेवेत असताना त्यांना खासगी



हॉस्पीटलमध्ये शस्त्रक्रिया, प्रॅक्टीस करता येत नाही, असे असताना त्यांनी चालू केलेल्या रेड्डी मॅटर्निटी ॲण्ड जनरल हॉस्पीटलमध्ये ११ ऑगस्ट रोजी सकाळी ज्योती शिशुपाल वलसे या मातेचे सिझर करून बाळांतपण केले. या शस्त्रक्रियेनंतर काही वेळेतच त्या मातेचा मृत्यू झाला. या प्रकारानंतर नातेवाईक व नागरिकांनी तीव्र क्षोभव्यक्त केला. त्यानंतर डॉ. अनिता अलगुले यांच्या विरोधात लातूरच्या विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये तसेच, सदोष मुनष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासकीय सेवेत असताना खासगीत शस्त्रक्रियाकरता येत नाही, तो गुन्हा आहे, असे असताना त्यांनी खासगी प्रॅक्टीस करित शासनाचा आर्थिक लाभ घेतला म्हणून डॉ. अनिता अलगुले यांच्या विरोधात. शासनाची आर्थिक फसवणूक के ली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बरे डॉ. अलगुले यांनी ज्या रेड्डी मॅटर्निटी हॉस्पीटलमध्ये रूग्ण मातेवर सिझर केले. त्या हॉस्पीटलची नोंदणीच नाही, जिथे शस्त्रक्रिया केली अशी त्या हॉस्पीटलची ईमारत नियमबाह्य आहे. त्या हॉस्पीटलमध्ये प्रशिक्षीत व पुरेसा स्टाफ नाही, म्हणून डॉ. अनिता अलगुले यांच्या विरोधात डॉ. सुजाता राजाभाऊ पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक लातूर यांच्या फिर्यादीवरून विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याने डॉ. अलगुले अडचणीत आल्या आहेत.

# पाथर्डी तालुका दुष्काळग्रस्त घोषित करून सरसकट पन्नास हजार नुकसान भरपाई द्या-काशीबाई गोल्हार

पाथर्डी । प्रतिनिधी

मान्सून सुरू होता होता जून जुलै ऑगस्ट सरत आला शेतकऱ्यांचा कष्टकऱ्यांचा असलेला पोळा उत्सव व गणरायाचे आगमन थोड्या दिवसात होणार आहे परंतु पाथर्डी तालुक्यात पावसाचा थेंबही न पडल्याने शेतकरी कष्टकरी व्यापारी यांच्यासह धरणी माय टाहो फोडत रडत असून शेतातील हिरवीगार पिके अश्रू ढळताना दिसत आहेत पाथर्डी तालुक्यात दुष्काळाचे सावट निर्माण झाले असून खरीप हंगामातील शेतकऱ्यांनी पेरणी केलेल्या कपाशी ऊस सोयाबीन उडीद मूग हरभरा भुईमूग जवारी बाजरी ही पिके जळून खाक होण्याच्या उंबरठ्यावर असल्याने पाथर्डी तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर पन्नास रुपये सरसकट भरपाई देण्याची मागणी भाजप महिला आघाडी तालुकाअध्यक्ष काशीबाई गोल्हार यांनी शासनाकडे केली आहे हवामान तज्ञांच्या अहवालानुसार व



पर्यावरणातील लिओन पर्जन्यवृष्टी कमी असल्याने सगळीकडे असलेल्या कडक उन्हामुळे आणि कोरडे हवामान असल्यामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे आणि काही ठिकाणी तर जमिनीला भेगा देखील पडल्या आहेत माणसांना व मुक्या जनावरांना पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असल्याने नदी तलाव विहिरी शेततळे बोरवेल कोरडे ठक पडले आहेत शेतकऱ्यांनी बियाणे खते औषधे आणि मशागतीसाठी मोठा खर्च केलेला आहे अनेकांनी उसनवारी करून किंवा कर्ज काढून पेरणी केलेली आहे सुरुवातीला पीक चांगले आल्याने यंदा उत्पन्न चांगले मिळेल अशी आशा निर्माण झालेली होती मात्र आता पाण्याअभावी पिके सुकू लागली आहेत कष्ट करून उभे केलेले पीक आता वाळताना पाहावे लागत आहे शासनाने तातडीने शेताची व पिकांची थेट बांधावर जाऊन पंचनामे करण्याची मागणी नुकसान झालेल्या पिकाचे महसूल आणि कृषी विभागाने तातडीने प्रत्यक्ष शेतात जाऊन पंचनामे करावेत अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी-टाटा ट्रस्टच्या करारातून ‘रूग्णांना’ दिलासा

## पहिल्याच करारातून ८९.६० लाखांची मदत

मुंबई। प्रतिनिधी

यकृत प्रत्यारोपण, कर्करोग आणि मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या महागड्या उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्ट यांच्यात करण्यात आलेला पहिलाच सामंजस्य करार राज्यातील गरजू रुग्णांसाठी दिलासादायक ठरत आहे. या करारामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळत असून रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या करारानंतर अवघ्या सहा महिन्यांत राज्यातील विविध भागांतील ९ रुग्णांना ८९ लाख ६० हजार ३०१ रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या मदतीतून यकृत प्रत्यारोपण, कर्करोगावरील उपचार, मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या अत्यंत खर्चिक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. पहिल्यांदाच झालेल्या या कराराअंतर्गत राज्यातील १५० गरजू रुग्णांना दुर्धर आणि गंभीर आजारावर उपचारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी वैद्यकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, अशाच प्रकारचे करार इतर अनेक नामांकित संस्थांसोबतही प्रक्रियेत असून ते लवकरच पूर्णत्वास येणार आहेत. त्यामुळे राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना दिलासा मिळण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून शासन, सामाजिक संस्था आणि आरोग्य क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या रुग्णांना नवे जीवन मिळण्यास मदत होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामंजस्य करार करण्यात आला. याच धर्तीवर इतरही अनेक नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यातून राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत उपलब्ध होणार आहे.

पैशांअभावी कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, या उद्देशातून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. गरजू रुग्णांनी अधिक माहितीसाठी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# लातूर जिल्ह्यात १ सप्टेंबरपासून दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट सक्ती

## ५२८ अपघातांत २४३ जणांचा मृत्यू.

लातूर। प्रतिनिधी

जिल्ह्यात वाढत असलेल्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी प्रशासन व लातूर पोलीस विभागाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील दुचाकीस्वारांसाठी दि. ०१ सप्टेंबर २०२६ पासून हेल्मेट वापरणे सक्तीचे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

लातूर पोलीस विभागाने वर्षाच्या सुरुवातीपासूनच अपघातांमधील जीवितहानी कमी करण्यासाठी जनजागृती तसेच कायदेशीर कारवाईवर भर दिला आहे. लातूर जिल्हा पोलीस सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून सुमारे १,५०० पोलीस अधिकारी व अंमलदारांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करणारी घटना म्हणजे रेणापूर पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार विश्वास जाधव हे कर्तव्य बजावून दुचाकीवरून लातूरकडे येत असताना त्यांच्या दुचाकीला मागून इंडिका कारने जोरदार धडक दिली. अपघात गंभीर असतानाही त्यांनी हेल्मेट परिधान केलेले असल्यामुळे त्यांचा जीव वाचला. यातून हेल्मेट हा केवळ कायद्याचा भाग नसून जीवन वाचविणारे सुरक्षा कवच आहे, हे स्पष्ट होते. लातूर जिल्ह्यातील २३ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ‘प्रवास सुरक्षित कराहेल्मेट वापरा’ या संदेशातून व्यापक जनजागृती करण्यात आली आहे. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या कडेला ठेऊन नागरिकांना अपघातांचे गांभीर्य समजावून सांगण्यात आले. त्याचबरोबर विना हेल्मेट तसेच विना सीटबेल्ट वाहन चालविणाऱ्या चालकांवर कायदेशीर कारवाईही करण्यात आली आहे. मात्र, जनजागृती व कारवाई करूनही अपघातांचे प्रमाण चिंताजनक आहे. चालू वर्षात लातूर जिल्ह्यात आतापर्यंत ५२८ रस्ते अपघात झाले असून त्यामध्ये २४३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. विशेषतः दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर न केल्यामुळे अनेकांना गंभीर दुखापतींसह प्राण गमवावे लागले आहेत. याउलट अपघाताच्या वेळी हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करणाऱ्या अनेक नागरिकांना दुखापत झाली असली तरी त्यांचा जीव वाचला आहे. त्यामुळे दि. ०१ सप्टेंबरपासून हेल्मेट सक्ती हा केवळ नियम किंवा दंडाची बाब न समजता प्रत्येकाने आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेची जबाबदारी म्हणून त्याकडे पाहावे.

### हेल्मेट पोलिसांच्या भीतीपोटी नव्हे, तर आपल्या कुटुंबासाठी वापरा!

प्रत्येक दुचाकीस्वाराने घराबाहेर पडताना हेल्मेट सोबत ठेवण्याऐवजी हेल्मेट डोक्यावर परिधान करूनच प्रवास सुरू करावा, तसेच दुचाकीवर मागे बसणाऱ्या व्यक्तीनेही हेल्मेट वापरावे. वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवावे, वाहतूक नियमांचे पालन करावे आणि स्वतःसोबत इतरांच्याही जीवाची काळजी घ्यावी.

# अखंड हरिनाम सप्ताहामधून घडले अध्यात्म अन् सेवाभावाचे खरे दर्शन

## राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथील हरिनाम सप्ताहासाठी १०१पोती साखर

शिर्डी

राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे सद्गुरू महंत गंगागिरीजी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्यावतीने १०१ साखर पोती सप्ताह कमिटीकडे सुपूर्त करण्यात आली. धनगरवाडी येथे आयोजित करण्यात आलेला अखंड हरिनाम सप्ताह हा परिसरातील भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा मोठा सोहळा आहे. सप्ताहाच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या साखरेची गरज लक्षात घेऊन पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्यावतीने १०१ साखर पोती सप्ताह कमिटीकडे सुपूर्त करण्यात आली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून यंदाच्या सप्ताहामध्ये योगदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.विखे पाटील परिवाराने जिल्ह्यातील धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांसह वारकरी सांप्रदायामध्ये नेहमीच योगदान आणि सहकार्य करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. धनगरवाडीतील या भक्तिमय सोहळ्यालाही कारखान्याच्या माध्यमातून मोलाचे सहकार्य करण्यात आले.

यावेळी विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन सोपान शिरसाठ, एम.डी. महेश कोनापुरे, संचालक लाटे, ताठे, यादव यांच्यासह कारखान्याचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि सप्ताह कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते. अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून धनगरवाडी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून सप्ताह कमिटीकडे करण्यात आलेल्या या सहकार्याबद्दल आयोजक आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. धनगरवाडी येथे सप्ताह घेण्याचा निर्णय झाल्यानंतर या गावाला जोडणाऱ्या सर्व रस्त्यांच्या कामासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ४ कोटी रुपयांचा निधी तातडीने मंजूर करून रस्त्यांची काम मार्गी लावली. यामुळे लाखो भाविकांना येणे सोयीस्कर झाले. याबद्दल महंत रामगिरी महाराज यांनी मंत्री विखे पाटील यांचे जाहीर अभिनंदन करून आभार मानले.

या सोहळ्यासाठी भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. या ठिकाणी दररोज लाखो भाविकांना आमटी आणि भाकरीचा महाप्रसाद देण्यात येतो. यासाठी नागरिकांकडून भाकरी दिल्या जातात तसेच सप्ताहाच्या ठिकाणी लाखो लिटर आमटी तयार केली जाते. लाखो भाविकांना दररोज आमटी भाकरीचा महाप्रसाद या सोहळ्यासाठी भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. या ठिकाणी दररोज लाखो भाविकांना आमटी आणि भाकरीचा महाप्रसाद देण्यात येतो. यासाठी नागरिकांकडून भाकरी दिल्या जातात तसेच सप्ताहाच्या ठिकाणी लाखो लिटर आमटी तयार केली जाते.

# जातेगाव शालेय समितीच्या अध्यक्षपदी रामेश्वर चव्हाण तर उपाध्यक्ष पदी रामेश्वर भिकारी

जातेगाव । प्रतिनिधी

जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड आज रोजी लोकशाही पद्धतीने खेळीमेळीच्या वातावरणात शाळेत पार पडली यावेळी प्रथम सदस्याची निवड करण्यात आली आणि त्या सदस्यांच्या सार्वमत अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड झाली यामध्ये शालेय व्यवस्थापन समितीचे नूतन अध्यक्ष म्हणून रामेश्वर चव्हाण तर उपाध्यक्ष म्हणून रामेश्वर भिकारी यांची निवड करण्यात

आली यावेळी सर्वांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्या दिल्या. गेवराई तालुक्यातील जातेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक



शाळा शाळेत नव्याने शालेय व्यवस्थापन समिती ची निवड लोकशाही पद्धतीने आयोजित करण्यात आली होती यावेळी सर्व पालक वर्गाच्या सार्वमत व खेळीमेळी वातावरणात सदस्य निवडण्यात आले आणि या सदस्यांच्या सार्वमत अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली आली यावेळी अध्यक्ष म्हणून रामेश्वर चव्हाण यांची तर उपाध्यक्ष म्हणून रामेश्वर भिकारी यांची निवड झाली या निवडी बद्दल शाळेच्या वतीनेक केंद्रप्रमुख सावित्री कांबळे मॅडम मुख्याध्यापक शिवाजी पवार सर येवले सर सहशिक्षक वृंद यांनी शाळेत समितीच्या सर्वांचे सन्मान करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

# प्रसूतीदरम्यानच्या कथित हलगर्जीपणप्रकरणी दोषींवर फौजदारी कारवाई करा!

## छाया पांचाळ, शेख मुस्कान व संध्या गायकवाड प्रकरणी जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन

**बीड। प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयातील माता व बाल रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल होणाऱ्या महिलांच्या उपचारादरम्यान कथित हलगर्जीपणाच्या घटना समोर येत असल्याचा आरोप करत, संबंधित प्रकरणातील दोषी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, तसेच त्यांची वैद्यकीय सनद रद्द करण्याबाबत नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली. या मागणीसाठी सोमवारी सकाळी जिल्हा रुग्णालयासमोर निदर्शने करण्यात आली.छाया गणेश पांचाळ व शेख मुस्कान यांच्या प्रसूतीदरम्यान मृत्यूच्या घटनांसह वडवणी येथील १९ वर्षीय संध्या सुरज गायकवाड यांच्या सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर उद्भवलेल्या कथित गुंतागुंतीची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात





आली. संध्या गायकवाड यांच्या पोटात शस्त्रक्रियेदरम्यान वैद्यकीय साहित्य राहिल्यामुळे संसर्ग झाल्याचा आरोप असून, त्यांच्यावर पुणे येथील ससून रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

या कथित प्रकरणांमध्ये नेमकी वैद्यकीय जबाबदारी निश्चित करण्यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी. दोषी आढळणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायद्यानुसार फौजदारी कारवाई करावी आणि संबंधितांच्या वैद्यकीय परवान्याबाबत सक्षम प्राधिकरणामार्फत नियमानुसार निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी यासाठी शासनाने कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. सुमारे २४ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या माता व बाल रुग्णालयातील कथित हलगर्जीपणाच्या घटनांमुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे डॉ. ढवळे यांनी म्हटले. गेल्या महिन्यात शेख मुस्कान यांच्या प्रसूतीदरम्यान मृत्यूचे प्रकरण समोर आले होते. त्यानंतर संध्या गायकवाड यांच्या प्रकरणानेही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे केवळ चौकशी समिती स्थापन करून विषय प्रलंबित न ठेवता चौकशीचा अहवाल सार्वजनिक करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली. बीड जिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल महिलांच्या मृत्यूच्या यापूर्वीच्या घटनांचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. छाया पांचाळ व मुस्कान शेख यांच्या मृत्यूच्या घटनांनंतर नातेवाईक व सामाजिक संघटनांकडून कारवाईची मागणी करण्यात आली होती. मात्र, चौकशीच्या नावाखाली विलंब होत असल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला. वारंवार कथित हलगर्जीपणाच्या घटना समोर येत असल्याने संबंधित प्रकरणांची स्वतंत्र चौकशी पूर्ण होईपर्यंत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांना निलंबित करावे, अशी मागणी पालकमंत्री सुनेत्रा पवार तसेच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले. रयावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे ( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), सादेक सय्यद ( शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), बाळासाहेब मोरे पाटील ( शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष), किश्किंधा पांचाळ ( जिल्हाध्यक्ष विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज बीड), सुनिता पांचाळ, रामधन जमाले ( जिल्हाध्यक्ष इंटक बीड), ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे, हनुमान घोडके,प्रा.आबासाहेब जाधव,भीमराव कुटे , शंकर घाडगे, सरफराज खान रामचंद्र धुमाळ, विश्वास भोरे आदी सहभागी झाले.

cmyk



# चहा घ्यायचा का? महागाई भिडली गगनाला

## पंधरा दिवसांत साखरेचे दर दुप्पट! सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले; 'गोड' साखरेची 'कडू' कहाणी

गेवराई । सय्यद कौसर

दैनंदिन जीवनाची सुरुवात ज्या चहाच्या गोडीने होते, त्याच चहाची गोडी आता महागाईमुळे कडू होण्याची वेळ आली आहे. गेल्या १५ दिवसांत साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या घरगुती बजेटवर त्याचा थेट परिणाम होत आहे. विशेषतः पंधरा दिवसांच्या कालावधीत साखरेच्या दरात जवळपास दुपटीने वाढ झाल्याने ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पूर्वी पाहुणे किंवा नातेवाईक घरी आले की, 'चहा ठेव रे' असा सहज आग्रह केला जायचा. मित्रमंडळींच्या गप्पांमध्ये चहा आणि एखादा गोड पदार्थ हा जणू दैनंदिन जीवनाचा भागच बनला होता. मात्र, वाढत्या महागाईमुळे आता अशा छोट्या-छोट्या खर्चाचाही विचार करावा लागत आहे.

साखरेसोबतच डाळी, खाद्यतेल, किराणा साहित्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीतही सातत्याने चढ-उतार होत असल्याने घरखर्चाचा ताळमेळ राखणे सर्वसामान्यांसाठी कठीण बनले आहे. उत्पन्न मर्यादित असताना खर्च मात्र वाढत असल्याने महिन्याच्या सुरुवातीलाच घरगुती अर्थसंकल्पाचे गणित बिघडत आहे.

दरवाढीच्या पार्श्वभूमीवर बाजारातील साठेबाजी आणि कृत्रिम टंचाई याबाबतही ग्राहकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या दरांवर प्रशासनाने लक्ष ठेवून अनावश्यक दरवाढ व




साठेबाजीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

एकीकडे रोजगाराच्या संधींचे आव्हान आणि बेरोजगारीची चिंता कायम असताना दुसरीकडे जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य कुटुंबांवरील आर्थिक ताण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शासनाने साखरेसह जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीवर तातडीने नियंत्रण आणून सामान्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

'गोड' साखर आता सर्वसामान्यांच्या रोजच्या चहातही कडूपणा आणत असल्याचे चित्र सध्या बाजारात पाहायला मिळत आहे.

साखरेच्या दरवाढीचा गोड पदार्थांना फटका; मिठाई-बेकरी पदार्थ महागले

साखरेच्या वाढत्या दराचा थेट परिणाम मिठाई, स्वीट होम तसेच बेकरी उत्पादनांच्या किमतींवर झाला आहे. साखरेच्या दरात झालेल्या वाढीमुळे उत्पादन खर्च वाढल्याने अनेक व्यावसायिकांनी गोड पदार्थांच्या किमतीत वाढ केली आहे.

मिठाई, पेढे, लाडू, केक, बिस्किटे आणि इतर बेकरी पदार्थांच्या दरात वाढ झाल्याने ग्राहकांच्या खिशाला चांगलीच झळ बसत आहे. सण-समारंभ तसेच पाहुणचारासाठी गोड पदार्थ घेणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना आता अधिक खर्च करावा लागत आहे.

साखरेची वाढलेली किंमत आता मिठाईच्या दुकानापासून थेट सर्वसामान्यांच्या ताटापर्यंत पोहोचली असून, 'गोड' पदार्थही नागरिकांसाठी कडू ठरत आहेत.

छायाचित्र खय्युम बागवान

# म्हैस व दुचाकी चोरणारा सराईत गुन्हेगार जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

### बीड एलसीबीकडून ७० हजारांचा मुद्देमाल जप्त; तीन गुन्हे उघडकीस

बीड/सिरसाळा:

शेतकऱ्यांची म्हैस आणि दुचाकी चोरी करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या (डउइ) पथकाने सापळा रचून बेड्या ठोकल्या आहेत. मुंजा भगवान मोरे (वय २६, रा. कारी, ता. धारूर, जि. बीड) असे अटक



करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्या अटकेमुळे सिरसाळा, केज आणि परंडा पोलीस ठाण्यातील एकूण ३ गुन्हे उघडकीस आले असून त्याच्याकडून ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सिरसाळा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या म्हैस चोरीच्या (गु.र.नं. २४४/२०२६, कलम ३०३(२) पान २ वर

# गुन्हेगार दादा खिंडकर व त्याच्या टोळीवर पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

सोशल मीडियाच्या माध्यमातून बदनामीकारक पोस्ट प्रसारित करणे, धमकी देणे तसेच दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून दादा खिंडकर व त्याच्या टोळीतील सदस्यांविरोधात पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात दादा बाबुराव खिंडकर, सुग्रीव विष्णू सोजे, ज्योतीराम कुंडलिक भटे, अविनाश पाटोळे तसेच इतर संबंधित व्यक्तींची नावे तक्रारीत नमूद करण्यात आली आहेत. शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर कचरू सातपुते यांनी याप्रकरणी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी तसेच त्यापूर्वीच्या काळातही फेसबुक, इन्स्टाग्राम व अन्य सोशल मीडिया माध्यमांवरून परमेश्वर सातपुते यांच्याबाबत बदनामीकारक व आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करण्यात आल्याचा आरोप आहे. संबंधित पोस्ट व कमेंटच्या माध्यमातून सातपुते यांची सामाजिक व राजकीय प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

तक्रारीमध्ये ११ ऑगस्ट २०२६, १२ जुलै २०२६, १७ जुलै २०२६ तसेच २२ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या सोशल मीडिया पोस्ट व कमेंटचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. या पोस्ट व कमेंटमध्ये आक्षेपार्ह भाषा वापरण्याबरोबरच भेटण्याचे आव्हान देणे, चेतावणीखोर वक्तव्य करणे व धमकीसदृश भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. पिंपळनेर पोलीस ठाण्यात या प्रकरणाची नोंद करण्यात आली असून, संबंधित प्रकरणात भारतीय न्याय संहिता () मधील कलम ३५६(२), ३५१(२) व ३(५)अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याचे कागदपत्रातून दिसून येते. दरम्यान, तक्रारीतील आरोपानुसार संबंधित व्यक्तींकडून सोशल मीडियाचा वापर करून सातत्याने बदनामी करण्याचा, दबाव निर्माण पान २ वर

# माजलगाव-गढी रोडवर भीषण अपघात; भरधाव पिकअप ने दुचाकीला उडवलं

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव-गढी रोडवरील व्यंकटेश लॉन्ससमोर दि २४ ऑगस्ट सोमवार रोजी दुपारी भीषण अपघाताची घटना घडली.भरधाव वेगाने जाणाऱ्या पिक अप वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील पती-पत्नी गंभीर जखमी झाले. जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे.या अपघातात मारफळा येथील रहिवासी विकास पवार (वय ३८) आणि त्यांच्या पत्नी पूजा पवार (वय ३२) हे गंभीर जखमी झाले आहेत.

या आपघाता बद्दल मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार,मारफळा येथील विकास पवार हे पत्नी पूजासोबत आपल्या शाईन दुचाकीवरून माजलगावहून गढीच्या दिशेने जात होते. याचवेळी त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या पिक अप वाहन क्रमांक एम एच.२३ ए.यु.४५०४ या वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.धडक एवढी भीषण होती की, विकास पवार आणि पूजा पवार हे दोघेही दुचाकीवरून रस्त्यावर फेकले गेले.या अपघातात दोघांनाही गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.दरम्यान, अपघात घडल्यानंतर संबंधित वाहनचालकाने जखमींना मदत करण्या ऐवजी घटनास्थळावरुन वाहनासह पळ काढल्याची माहिती समोर येत आहे.त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकाचा तातडीने शोध घेऊन त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

जखमी पती-पत्नीवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.या घटनेची अधिकृत माहिती आणि अपघाताचे नेमके कारण पोलिस तपासानंतर स्पष्ट होणार आहे.भरधाव वाहनांचा वेगामुळे माजलगाव-गढी रोडवरील अपघातांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून,या मार्गावर वाहतूक नियंत्रण आणि वेगमर्यादेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# एकाचा अपघाताने तर दुसऱ्याचा हृदयविकाराने मृत्यू

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द गावातील दोन व्यक्तींचा





वेगवेगळ्या कारणांनी मृत्यु झाल्याची घटना घडली आहे. एकाचा पुणे येथे दुचाकी अपघातात, तर दुसऱ्याचा मुंबई येथे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यु झाला. एकाच कालावधीत घडलेल्या या दोन घटनांमुळे हिंगणी खुर्द गावावर शोककळा पसरली आहे.

हिंगणी खुर्द येथील संदीप प्रभाकर मुंडे हे पुणे येथे डिव्हिजन बँक मॅनेजर म्हणून कार्यरत होते. दरम्यान, पुणे येथे दुचाकीवरून जात असताना त्यांचा अपघात झाला. या अपघातात त्यांचा दि.२२ ऑगस्ट रोजी मृत्यु झाला.दरम्यान, याच गावातील तुकाराम आंधळे हे एस.टी. महामंडळात पान २ वर

# समता परिषदेच्या महिला बीड जिल्हाध्यक्षपदी जयश्री खेत्री यांची निवड

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या महिला बीड जिल्हाध्यक्षपदी सौ. जयश्री कुंडलिक खेत्री (मेश्राम) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडी बाबतचे नियुक्तीपत्र समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री ना छगनरावजी भुजबळ साहेब, कार्याध्यक्ष माजी खा. समीरभाऊ भुजबळ, आ. पंकज भाऊ भुजबळ, महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड.सुभाष राऊत यांच्या उपस्थितीत देण्यात आले आहे.

नाशिक येथे संपन्न झालेल्या समता परिषदेच्या राज्य कार्यकारणीच्या बैठकीत हे पान २ वर



# माजलगाव नगर परिषदेत विरोधक नसल्याने आता जनतेलाच विरोधकाची भूमिका घ्यावी लागेल : काँग्रेस

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील विविध प्रलंबित जनहिताच्या मागण्यांकडे नगर परिषदेचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर परिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात आले. शहरातील प्रमुख रस्त्याची तातडीने दुरुस्ती व बांधकाम करावे, फळविक्रेत्यांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून द्यावी, सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था करावी, तसेच नगर परिषदेमधील कथित बोगस कामांची चौकशी करावी, अशा विविध मागण्या यावेळी



करण्यात आल्या.

बाबासाहेब आंबेडकर चौक ते पाटील गल्लीमार्गे साठेनगरपर्यंतचा मुख्य रस्ता तातडीने बांधण्यात यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. तसेच बाजारपेठेतील फळविक्रेत्यांच्या समस्यांकडेही प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेत सत्ताधारी आणि विरोधक जनहिताच्या प्रश्नांपेक्षा स्वहितासाठी एकत्र आल्याचा आरोप केला. जनतेने आ. प्रकाश सोळंके यांच्या गटाला विरोधी पक्षाची भूमिका बजावण्याचे जनादेश दिले असतानाही सत्ताधारी पक्षासोबत हातमिळवणी केल्याचा आरोप काँग्रेसच्या वतीने करण्यात आला. त्यामुळे नगर परिषदेत प्रभावी विरोधक राहिलेला नसून, आता जनतेलाच विरोधकाची भूमिका पान २ वर

# धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय गणेश मंडळांनी वर्गणी गोळा केल्यास गुन्हे दाखल होणार

बीड । प्रतिनिधी

गणेशोत्सव व दुर्गोत्सव साजरा करण्यासाठी सार्वजनिक वर्गणी गोळा करण्यापूर्वी धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. पूर्वपरवानगीशिवाय वर्गणी गोळा केल्याचे आढळून आल्यास संबंधित गणेश मंडळांविरुद्ध गुन्हे दाखल केले जाऊ शकतात, असे आवाहन धर्मादाय उप आयुक्त कार्यालयाने केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१-क अन्वये सार्वजनिक वर्गणी किंवा देणगी गोळा करण्यासाठी ऑनलाइन परवानगीची तरतूद करण्यात आली आहे. नोंदणीकृत संस्था अथवा न्यास वगळता इतर सर्व मंडळांना ही परवानगी घेणे आवश्यक आहे.

परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रे:

* मंडळातील सदस्यांचे अधिकृत ओळखपत्र (आधार, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा मतदान ओळखपत्र)
* जागेचे संमतीपत्र किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका) ना-हरकत प्रमाणपत्र
* मंडळ स्थापनेचा व उत्सव समितीचा ठराव
* जुन्या मंडळांसाठी मागील वर्षाचा खर्चाचा हिशोब व जमा-खर्च ५००० रुपयांपेक्षा जास्त असल्यास लेखापरीक्षक () अहवाल
* कार्यकारी मंडळाच्या प्रतिनिधींची नावे, पत्ते, संपर्क क्रमांक, पावती पुस्तकांचा तपशील व वर्गणीचा हिशोब

ऑनलाइन अर्ज कसा कराल?

मंडळांनी धर्मादाय विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन '४१-क' या पर्यायावर क्लिक करावे. अर्जातील सर्व माहिती भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड केल्यानंतर, छाननी करून ऑनलाइन परवानगी दिली जाईल. विनापरवानगी किंवा बेकायदेशीरपणे वर्गणी जमा करून गैरवापर केल्यास पोलिसांकडून कठोर कारवाई केली जाईल, असे धर्मादाय उप आयुक्त कांचनगंगा जाधवांनी स्पष्ट केले आहे.

# शारदा प्रतिष्ठानचे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर -अमरसिंह पंडित यांच्याकडून घोषणा



श्री.तारेख शफिक शेख, माध्यमिक विद्यालय, भेंडटाकळी; श्री.जालिंदर दिनकर ठवरे, जि.प.कें.प्रा.शाळा, रेवकी; श्री.संतोष राधाकिसन कोठेकर, जि.प.प्रा.शाळा, हरिलालनाईक तांडा; श्री.गणेश ज्ञानोबा घाटूळ, जि.प.कें.प्रा.शाळा, तालखेड; श्रीमती भारती गणपतराव क..., जि.प.माध्य.शाळा मुलांची,गेवर...; श्री.उद्धव बाबुराव क्षिरसागर, जि.प.प्रा.शाळा, मळशीतांडा; श्री.मिनीनाथ बाबूराव पिसे, जि.प.प्रा.शाळा,हनुमान नगर गा.जळगाव; श्री.शेषराव दिनकर मराडे, जि.प.प्रा.शाळा, लोळदगाव; श्री.सुंदरराव नामदेव तांबे (मु.अ.), जि.प.कें.प्रा.शाळा, कामखेडा; श्री.विजयकुमार मुरलीधर शरणांगत, जि.प.प्रा.शाळा, रुई

## सहकार मंत्र्यांच्या शुभहस्ते शिक्षक दिनी पुरस्कारांचे होणार वितरण

गेवराई । प्रतिनिधी

शारदा प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक पुरस्काराला शैक्षणिक क्षेत्रात अनन्य साधारण महत्व आहे. तटस्थ निवड समितीकडून शिक्षकांच्या शैक्षणिक कार्याचा मागोवा घेऊन पुरस्कारार्थींची निवड करण्याची परंपरा प्रतिष्ठानने राखली आहे. शारदा प्रतिष्ठानच्या १९ व्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची अधिकृत घोषणा कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली आहे. शनिवार, दि.५ सप्टेंबर रोजी सकाळी १०३०: वाजता गोदावरी सभागृह गेवराई येथे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते दिमाखदार सोहळ्यात आदर्श शिक्षकांचा सपत्नीक गौरव होणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी दिली आहे. शारदा प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

गेवराई विधानसभा मतदार संघातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणी गुरुजनांचा गौरव व्हावा, अतुलनीय काम करणाऱ्या शिक्षकांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने सन २००८ पासून माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शारदा प्रतिष्ठानकडू अविरतपणे शिक्षकदिनी आदर्श शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. शारदा प्रतिष्ठानच्या १९ व्या आदर्श शिक्षक पुरस्काराची अधिकृत घोषणा कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली आहे. शिक्षक दिनी शनिवार, दि.५ सप्टेंबर रोजी सकाळी १०३०: वाजता गोदावरी सभागृह, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे राज्याचे सहकारमंत्री ना.बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते तर आ. विजयसिंह पंडित यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत आदर्श शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी दिली आहे. यावर्षी प्राथमिक विभागातून शेषेराव मराठे (जि.प.प्रा.शाळा, लोळदगाव), संतोष कोठेकर (जि.प.प्रा.शाळा, हिरालाल नाईकतांडा), मिनीनाथ पिसे (जि.प.प्रा.शाळा, हनुमाननगर), गणेश घाटुळ (जि.प.प्रा.शाळा, तालखेड, ता.माजलगाव), मुख्याध्यापक सुंदरराव तांबे (जि.प.प्रा.शाळा, कामखेडा, ता.बीड), विजयकुमार शरणांगत (जि.प.प्रा.शाळा, रुई), जालिंदर ठवरे (जि.प.प्रा.शाळा, रेवकी), उध्दव क्षीरसागर (जि.प.प्रा.शाळा, मळशीतांडा) तर माध्यमिक विभागातून श्रीमती भारती कोकाट (जि.प.माध्य. मुलांची शाळा, गेवराई), तारेख शफिक शेख (शिवशारदा पब्लिक स्कुल, शिवाजीनगर) आणि विशेष पुरस्कार म्हणून केंद्र प्रमुख श्रीमती वैशाली वाघमारे (जि.प.प्रा.शाळा, बागपिंपळगाव वसाहत) या अकरा शिक्षकांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी अधिकृत निवड झाल्याची घोषणा शारदा प्रतिष्ठानकडून कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली आहे. पुरस्कारार्थी शिक्षकांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ देऊन सपत्नीक मान्यवरांच्या शुभहस्ते शिक्षक दिनी गौरव करण्यात येणार आहे.

शारदा प्रतिष्ठानच्या तटस्थ निवड समितीकडून पुरस्कारार्थी शिक्षकांची निवड केली जाते. निवड करताना अर्ज, शिफारस, प्रमाणपत्र अशा प्रकारचे सोपस्कार न करता शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांची त्रयस्त यंत्रणेकडून दखल घेऊन त्यांचा सन्मान करत आहे. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ नारायणराव मोटे यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीमध्ये ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण काळम पाटील, तात्यासाहेब मेघारे, मुख्याध्यापक विजय डोंगरे, विष्णू खेत्रे, अशोक निकाळजे, विष्णूपंत सोळुंके, सिध्देश्वर जंगले यांचा समावेश असून समितीचे समन्वयक म्हणून प्राचार्य डॉ.शौकत पटेल हे काम पाहत आहेत. दरवर्षी शिक्षक दिनी दिमाखदार सोहळ्यात गुणवान शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्याचा प्रयत्न सातत्याने शारदा प्रतिष्ठानकडून होत आहे. तटस्थ यंत्रणेकडून शिक्षकांच्या कामकाजाचे मुल्यमापन होत असल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात या पुरस्काराला मानाचे स्थान आहे. यावर्षीच्या पुरस्कार वितरण समारंभाला शिक्षणप्रेमी नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk